# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ / पौष ५, १९४४ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास व पंचायत राज, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३) कामगार मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(५) महिला व बालविकास, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५५**

---

### सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे स्थापन करण्याबाबत

**(१) * १५९५३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये लोकसंख्या व अंतरांच्या निकषानुसार २२ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६८ प्राथमिक उपकेंद्रांची गरज असल्याचे जनआरोग्य अभियानांतर्गत करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्राच्या आराखड्यास जिल्हा परिषेदच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी घेऊन दिनांक २५ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास आरोग्य विभागाकडे मंजुरीसाठी पाठविला असता सदर अहवाल अद्याप विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सोलापूर जिल्ह्यात पायाभूत आरोग्य सेवा निर्माण होण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी जिल्ह्यामध्ये लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार २२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ६८ उपकेंद्रे नवीन मंजूरीसाठी प्रस्तावित केली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचेमार्फत दिनांक २५/१०/२०१९ च्या पत्रान्वये जोडबृहत आराखडयाचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयास सादर करण्यात आलेला होता. तथापि, सदर प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी यांना परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत आरोग्य सेवा आयुक्तालयाने कळविले आहे. तथापि, सदर कार्यालयाचा प्रस्ताव अप्राप्त आहे.

(३) सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे राज्यात नवीन आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(२) * १६१४१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १४२१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना गेल्या अनेक वर्षांपासून दरमहा रुपये ४० एवढे अत्यंत तुटपुंजे विद्यावेतन देण्यात येत असून, सदरील विद्यावेतनात वाढ करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात रुपये ४०/- वरुन रुपये ५००/- वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर विभागस्तरावर कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने, सदरील विद्यावेतनात तातडीने वाढ करावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१), (२) व (३) सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांना रुपये ४०/- वरुन रुपये ५००/- प्रमाणे विद्यावेतनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथे ट्रॉमा केअर सेंटरची उभारणी करण्याबाबत

**(३) * १५३२२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १३८७० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद शहरालगतच सोलापूर-धुळे हा राष्ट्रीय महामार्ग असून दौलताबाद, खुलताबाद, वेरुळ तसेच म्हैसमाळ, सुलिभंजन आदी पर्यटन स्थळे व धार्मिक स्थळे असल्याने पर्यटक व भाविकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असून वाहनांची रहदारी मोठ्या प्रमाणावर असल्याने खुलताबाद येथे ट्रॉमा केअर सेंटरची उभारणी करण्याची गरज निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ५ वर्षांत सदर परिसरात किमान ९००-१००० अपघात झाले असून अपघातग्रस्तांना वैद्यकीय सोई-सुविधा मिळत नसल्याने ग्रामीण रुग्णालयातून रुग्णांना औरंगाबाद तसेच अन्य रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय, तसेच त्यामुळे तात्काळ उपचार मिळत नसल्याने मृत्यूचे प्रमाणही वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खुलताबाद येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात मंजूर पदांपैकी ४० टक्के पदे उपलब्ध असून इतर रिक्त पदे जाहिरातीद्वारे सरळसेवेने भरण्याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, खुलताबाद शहर हे तालुक्याचे ठिकाण असून सुध्दा सदर ठिकाणी फक्त ३० बेडचे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. मनुष्यबळ, औषधी साहित्य सिमीत असते, म्हणून सदर ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरु करणेसाठी मागील ५ वर्षात ३ वेळेस आरोग्य विभागाने प्रस्ताव शासनाकडे सादर केला परंतु त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथील प्रस्तावित ट्रॉमा केअर युनिट हे शासनाने दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची परिपूर्तता करत नसल्याचे निदर्शनास आले असून त्यानुषंगाने निश्चित केलेल्या अटींची पूर्तता करुन खुलताबाद येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याकरीता मंजुरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद येथे मंजूर ३० पदांपैकी २० पदे भरलेली असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

तथापि, दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद येथे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याकरीता सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय यांचेकडून उपसंचालक, आरोग्य सेवा औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत खाजगी संस्थानी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४) * १५४१० श्री.जयंत पाटील, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेची राज्य शासनाच्या ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ग्रामविकास विभागाच्या वतीने अंमलबजावणी करण्यात येत असून राज्यातील बेरोजगार तरुण-तरुणींना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी छत्तीसगड येथील सुर्या वायर्स प्रा.लि., नाशिकमधील ध्येयपूर्ती, पुण्यातील जाईजुई, ॲस्टर फलेअर ॲण्ड लेदर या चार कंपन्यांची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने २५०० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणार असल्याचे शासनाला कळविले असतानाही अटी व शर्तींचा भंग करुन रुपये ७ कोटी २६ लाखांचा अपहार झाला असल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशिक्षण सुरू करण्यासाठी सदर चार कंपन्यांना शासनाकडून कोट्यवधींचा म्हणजेच पंचवीस टक्के आगाऊ निधी देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सन २०१७ मध्ये अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा या जिल्ह्यातील तरुणांना प्रशिक्षण देण्याचा ठेका सूर्या वायर्स प्रा.लि. या कंपनीला दिला होता तसेच सन २०१७ ते २०२१ या कालावधीत केवळ ५८८ लाभार्थींना प्रशिक्षण देऊन त्यापैकी केवळ ४० जणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली असून सदर कंपन्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश मा.ग्रामविकास मंत्री महोदयांनी दिली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामीण कौशल्य योजनेच्या राज्य अभियान व्यवस्थापनाने या चारही कंपन्यांविरोधात नवी मुंबईतील सीबीडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून त्यानुसार पोलिसांनी छत्तीसगड येथील सूर्या वायर्स प्रा. लि. या कंपनीसह तीन संचालकांविरोधात अपहाराचा गुन्हा दाखल केला असून त्यानुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाच्या अटी व शर्तींचा भंग करून गैरव्यवहार करणाऱ्या सदर चार कंपन्यांविरोधात कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) सूर्या वायर्स प्रा.लि. या संस्थेने ५८८ लाभार्थींना प्रशिक्षण व ४० प्रशिक्षित लाभार्थींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिल्याचे कळविले आहे.

सूर्या वायर्स प्रा.लि., ध्येयपूर्ती, जाईजुई, ॲस्टर अपेरल ॲण्ड लेदर या चारही संस्थांच्या विरोधात नवी मुंबई येथील सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात FIR करण्याकरीता लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली असून त्यापैकी सूर्या वायर्स प्रा.लि. या संस्थेविरुध्द FIR दाखल करण्यात आलेला आहे.

तथापि, सूर्या वायर्स प्रा.लि. या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून न्यायालयाने लवाद नेमूणक केला आहे. सदर लवादाबाबत राज्य व्यवस्थापन कक्षाकडून हरकत घेण्यात आली आहे.

(६) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सदर संस्थांना देण्यात आलेला निधी परत मिळविण्याबाबत पोलिसांमार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील प्राविण्यप्राप्त मल्लखांब खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत

**(५) * १५२०० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अखिल भारतीय खेल परिषद, भारत सरकार या परिषदेने मल्लखांब ह्या खेळातील राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्तीकरीता समावेश करण्यासंबंधी सर्व राज्यांना आदेश निर्गमित केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त केलेल्या मल्लखांब खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या निर्णयाबाबत दिनांक ८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून अद्यापपर्यंत सदर समितीचा अहवाल शासनास सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल तातडीने पूर्ण करण्यासाठी तसेच राज्यातील आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्यप्राप्त मल्लखांब खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी मल्लखांब या खेळाचा सदरच्या शासन निर्णयात समावेश करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

अध्यक्ष, अखिल भारतीय खेळ परिषद, भारत सरकार यांच्या दिनांक ११ सप्टेंबर,२०२० च्या पत्रान्वये, इतर खेळांसह "मल्लखांब" या खेळ प्रकारातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा समावेश गट-क मधील पदांच्या खेळाडू भरतीकरीता करण्याबाबत, सर्व राज्य शासनांना सुचीत केले आहे. तथापि, मल्लखांब या देशी खेळप्रकारातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे याकरीता महाराष्ट्र शासनाने, यापुर्वीच म्हणजेच दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार "मल्लखांब" या खेळाचा समावेश ५ टक्के खेळाडू आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय केले आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत सदर समितीच्या कार्यकक्षेमध्ये थेट नियुक्तीसाठी पात्र खेळांच्या निश्चीती करण्याची बाब समाविष्ठ नाही. इतर बाबी संदर्भात सदर समितीने सादर केलेल्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. सदर खेळाचा समावेश शासनाने थेट नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या वरिष्ठ अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये नाही. त्यामुळे मल्लखांब या खेळाचा समावेश थेट नियुक्तीसाठी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६) * १५१६८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्गावरील अपघातांची मोठी संख्या लक्षात घेऊन जखमी रुग्णांना तात्काळ मदत मिळावी, यासाठी राज्य शासनाने ‘बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजने’ ची घोषणा करून आजमितीस सात वर्षांचा कालावधी होऊनही तसेच दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित करुनही सदर योजनेची अंमलबजावणी अद्याप करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची घोषणा सन २०१६ मध्ये झाली असून महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेतून उपचार करण्याचे तसेच अन्य रूग्णांना राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या माध्यमातून उपचार करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत एकूण ७४ प्रकारच्या प्रक्रियांसाठी ३० हजार रुपयापर्यंतचे विमा संरक्षण देण्याबाबत सन २०२१ मध्ये शासन निर्णय होऊनही त्याची आजमितीस अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपघातात कोणत्याही राज्याचा नागरिक जखमी झाला तरी त्यालाही बाळासाहेब ठाकरे अपघात योजनेंतर्गत पहिले ७२ तास मोफत उपचार अथवा ३० हजार रुपयांची मदत विमा योजनेच्या माध्यमातून देण्याचा निर्णय होऊनही त्याची आजमितीस अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील महामार्गावरील अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता जखमी रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत याकरीता शासनाने निर्गमित केलेल्या शासननिर्णयाद्वारे बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) ते (५) हे खरे आहे.

दिनांक १६/०९/२०२० रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार दिनांक १४/१०/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा / बदल प्रस्तावित असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालगृहांमधील समस्यांबाबत शासनाने नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(७) * १६०६३ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ८५० इतकी बालगृहे (रिमांड होम) असून विविध कारणांमुळे तेथे ठेवण्यात आलेल्या मुलांची संख्या एक हजारापेक्षा अधिक असून त्यांच्यासाठी जे.जे. ॲक्टनुसार पुरक नियमावली तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक बालगृहांना अद्याप अनुदान मिळालेले नसल्याने तसेच बालगृहांमध्ये कर्मचारी वर्ग पूर्ण क्षमतेने नियुक्त केलेला नसून समुपदेशकांचीही पदे रिक्त असल्याने मुलांच्या अडचणी व समस्यांकडे व्यवस्थितपणे लक्ष देता येत नसल्याचेही दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालगृहात दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक मुलाचा संघर्ष वेगळा असतो व ही मुले स्पर्शालाही पारखी झालेली असतात, त्यामुळे बाहेरच्या जगात कसे वावरायचे हे त्यांना कळत नाही, त्यामुळे योग्य त्या समुपदेशनाअभावी अनेकदा मुले बालगृहातून पळून जाण्याच्या घटना घडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२२ मध्ये याबाबत एक समिती स्थापन केली असली तरी बालगृहातील काही तांत्रिक बाबींमध्ये सुधारणा होणे गरजेचे असल्याचेही आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास बालगृहात एखाद्या मुलाचा झालेला मृत्यू हा "कोठडी मृत्यू" समजून त्याबाबत जलदरीत्या प्रक्रिया राबवून "मुलाने आत्महत्या केली की खून झाला" त्यामागील कारणांचा शोध घेऊन दोषीला शिक्षा झाली का, याचा पाठपुरावा करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हा विधी प्राधिकरण तसेच मानवाधिकार आयोगाकडे सादर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात बालकांची काळजी व संरक्षण घेणाऱ्या एकूण ४८६ शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी एकूण १५ शासकीय तसेच ३७ स्वयंसेवी निरीक्षणगृहे कार्यरत असून त्यामध्ये सद्य:स्थितीत १०११ इतके प्रवेशित दाखल असून त्यांची मंजूर प्रवेशित क्षमता २६५९ इतकी आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ तयार करण्यात आले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील बालगृहांचे १४.१० कोटी इतके प्रलंबित अनुज्ञेय अनुदान देण्यात आले असून बालगृहाचे उर्वरित प्रलंबित अनुज्ञेय अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. राज्यातील शासकीय बालगृहे व निरीक्षणगृहांमधील कर्मचाऱ्यांची व समुपदेशकांची काही पदे रिक्त असून सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे व अशासकीय निरीक्षणगृहातील कर्मचारी व समुपदेशक यांची पदे कंत्राटी असून ती देखील भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील या विभागांतर्गतच्या सर्व निवासी संस्थांच्या सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचविण्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(५) संस्थांमध्ये मृत्यू झालेल्या बालकांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग यांचेकडे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी सुनावणी झालेली असून सदर सुनावणीमध्ये विभागामार्फत सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये बॉयलरचा स्फोट होऊन कामगारांच्या मृत्यूंच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(८) * १६२३८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पालघर, रायगड, डोंबिवलीतील औद्योगिक वसाहतींमध्ये बॉयलर चा स्फोट होवून कामगारांचा मृत्यू झाल्याच्या घटना माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात बॉयलरच्या संदर्भात शासनाने धोरण निश्चिती केली असून रिॲक्टरच्या (reactor) संदर्भात अद्याप कोणतेही धोरण निश्चित केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकुशल कामगारांच्या नियुक्ती, जुने बॉयलर व रिॲक्टरचा वापर यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बॉयलर प्रमाणे रिॲक्टरबाबत धोरण निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच अपघातात मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) पालघर व डोंबिवली या औद्योगिक वसाहतींमध्ये माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बॉयरलचे स्फोट झालेले नाहीत.

तथापि, मे.महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लि., वेस्ट हिट रिकव्हरी प्रोजेक्ट, गॅस टर्बाईन पॉवर स्टेशन, उरण जि.रायगड या वीज निर्मिती करणाऱ्या कारखान्यात दिनांक ०९/१०/२०२२ रोजी बॉयलरच्या वॉटर सरक्युलेशन पंपात दाब वाढून पंपाची केसींग फुटल्यामुळे तीन कामगारांचा मृत्यू व एक कामगार जखमी झाला आहे.

(२) राज्यामध्ये बाष्पक तपासणीकरीता धोरण निश्चित असून, बाष्पकांची तपासणी ही केंद्र शासनाच्या बाष्पके अधिनियम, १९२३ अन्वये करण्यात येते.

तसेच कारखाने अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मध्ये रिॲक्टर बाबतच्या सुरक्षिततेविषयक तरतुदी असल्याने, या तरतुदींच्या अनुषंगानेच कार्यवाही करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणाची बाष्पके संचालनालय व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

मे.महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लि., वेस्ट हिट रिकव्हरी प्रोजेक्ट, गॅस टर्बाईन पॉवर स्टेशन, उरण जि.रायगड या वीज निर्मिती करणाऱ्या कारखान्यांतील बाष्पकाचा हाय प्रेशरवॉटर सरक्युलेशन पंपात दाब वाढून पंपाची केसींग फुटल्यामुळे अपघात घडल्याचे चौकशीदरम्यान आढळून आले आहे.

कारखाने अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मध्ये रिॲक्टर बाबतच्या सुरक्षिततेविषयक तरतुदी असल्याने स्वंतत्र धोरण निश्चितीची आवश्यकता नाही.

३ मृत कामगारांच्या वारसांस देण्यात आलेल्या मदतीचा तपशील पुढीलप्रमाणे:

१) श्री.विवेक अशोक धुमाळे-ज्युनिअर इंजिनिअर, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी

Group Insurance-रुपये २०,००,०००/-

Employee Compensation-रुपये १४,१७,९५०/-

CPF-५,१४,३५३/-

CPF Insurance- रुपये ७,००,०००/-

नोकरी- महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी शासनाचा उपक्रम असल्याने नियमाप्रमाणे वारसास नोकरी देण्याची कार्यवाही सुरू आहे.

२) श्री.कुंदन कमलाकर पाटील, बॉयलर टेक्निशीयन

Group Insurance-रुपये २०,००,०००/-

Employee Compensation-रुपये १३,१६,५५०/-

CPF-रुपये १६,५४,५९४/-

CPF Insurance-रुपये ७,००,०००/-

उपरोक्त दोन्ही मृत कामगारांच्या वारसांनी वारसा दाखला सादर केला नाही. त्यामुळे दिवाणी न्यायालय, उरण येथे दावा दाखल करण्यात आला असून, मृत कामगारांच्या वारसास आर्थिक मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

३) श्री.विष्णू पाटील, कंत्राटी कामगार हे राज्य कामगार विमा मंडळ यांचेकडे नोंदणीकृत कामगार असल्याने, त्यांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरू असून रुपये १०,००,००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

तसेच श्री.पाटील यांच्या पत्नीस दिनांक ११/११/२०२२ पासून कारखान्यात रूजू करून घेण्यात आले आहे. जखमी कामगाराचा वैद्यकीय उपचाराचा खर्च व्यवस्थापनाने केला असून, ते कारखान्यात पुर्वरत रूजू झाले आहेत.तसेच वैद्यकीय कालावधीतील त्यांचा पगार देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश जिल्ह्यातील माहेरघरांची दुरवस्था झाल्याबाबत

**(९) * १५८५६ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पालघर जिल्ह्यातील १३ ठिकाणी माहेरघर बांधण्याकरीता लाखो रुपयांचा निधी खर्च करूनही त्यातील आठ माहेरघर इमारतींची दुरवस्था झाली असून केवळ पाच माहेरघर सुस्थितीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिदुर्गम भागात रस्ते अभावी अथवा अन्य कारणांमुळे आरोग्यसेवा गावपाड्यात पोहोचत नाहीत त्यामुळे गर्भवती प्रसूत महिला आणि नवजात बालकांना वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत त्यास आळा घालण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत माहेरघर योजना सन २०१३-१४ मध्ये अस्तित्वात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील पालघर, नंदुरबार, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, नाशिक, यवतमाळ आणि नांदेड अशा आदिवासी जिल्ह्यांमध्ये प्रथम माहेरघर योजना सुरू करण्यात येऊन प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात सन २०१६ मध्ये इमारतींचे बांधकाम करण्यात येऊनही सदर माहेरघरांची इतक्या कमी कालावधीत दुरवस्था होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुरवस्था झालेल्या माहेरघरांची तातडीने दुरुस्ती करावी यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) १३ माहेरघरांपैकी ७ माहेरघरे सुस्थितीत असून ६ माहेरघरांच्या दुरुस्ती व देखभालीची आवश्यकता आहे.
(२) हे खरे आहे.

मात्र माहेरघर योजना सन २०१०-११ पासून कार्यरत आहे.
(३) राज्यात सद्य:स्थितीत ९० माहेरघरे आहेत. सन २०१०-११ मध्ये ५८ माहेरघरे बांधण्यात आली असून सन २०१६-१७ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात २३ व पालघर जिल्ह्यात ९ अशी एकूण ३२ माहेरघर बांधण्यात आली आहेत. त्यापैकी पालघर जिल्ह्यातील ६ माहेरघरांची अतिवृष्टी, देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक तरतूद नसणे, तसेच कोविड कालावधीत वापर न होणे इ. कारणामुळे दुरवस्था झालेली आहे.
(४) निधी उपलब्धतेनुसार दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयांचा विस्तार करण्याबाबत

**(१०) * १५५६४ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार कुटीर (कॉटेज) रुग्णालयाचे (ता.जव्हार,जि.पालघर) उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर आणि मोखाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयांचा २० खाटांचा विस्तार करण्यासाठी नव्या इमारतींच्या बांधकामाला सन २०१२ मध्ये मंजुरी देण्यात आली असून १० वर्षांचा कालावधी होवून गेला तरीही अद्याप इमारतीच्या बांधकामास सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाडा (जि.पालघर) येथील नागरिकांना ग्रामीण आरोग्य यंत्रणेवर अवलंबून रहावे लागत असून दर दोन-तीन वर्षांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपयांचा खर्च केला जात असूनही उक्त रुग्णालयांचा विस्तार प्रलंबित असून सर्वसामान्य कुटुंबातील आजारी रूग्णांना नाशिक, ठाणे, मुंबई यांसारख्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील कुपोषण, बालमृत्यू याकरीता तेथील आदिवासी रुग्णांना आसे, मोऱ्हाडा, वाशाळा, खेडाळा या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, नर्स, आरोग्य सेवकांवर अवलंबून रहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जव्हारच्या कुटीर रुग्णालयाचे (जि.पालघर) उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर आणि मोखाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयांचा २० खाटांचा विस्तार करुन नव्या इमारतींच्या बांधकामाला सुरुवात करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांची देखभाल व लहान मोठे बदल व दुरुस्ती वेळोवेळी केली जात असते. सद्य:स्थितीत ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथे येणाऱ्या सर्व रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर रुग्णांवर योग्य ते उपचार केले जात आहेत.

(३) हे खरे नाही.

मोखाडा तालुक्याच्या ठिकाणी ०१ ग्रामीण रुग्णालय व मोखाडा तालुक्यात ०४ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. सदर रुग्णालयातून बाह्यरुग्ण व आंतररुग्णांची तपासणी केली जाते.

(४) उपजिल्हा रुग्णालय, जव्हारचे १०० खाटांवरुन २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन बांधकामाचे रुपये ९०६२ लक्ष इतक्या रकमेस शासन निर्णय दिनांक २०/०९/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारत बांधकामास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच २०० खाटांच्या रुग्णालय बांधकामासाठी जागा कमी पडत असल्याने नवीन जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथील श्रेणीवर्धीत ५० खाटांचे बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे तांत्रिक मंजूरीकरिता मुख्य अभियंता यांचेकडे सादर करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कौशल्य विकास विभागात होणाऱ्या संभाव्य शिक्षकीय संवर्ग पदभरतीपूर्वी कंत्राटी शिक्षकीय पदधारकांचे समायोजन करण्याबाबत

**(११) * १५७९४ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य विकास विभागात होणाऱ्या संभाव्य शिक्षकीय संवर्ग पदभरतीपूर्वी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत कंत्राटी शिक्षकीय पदधारकांचे समायोजन करण्यात आले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कंत्राटी तत्वावर मान्यता दिलेल्या ३२६ पदांना नियमित पदे म्हणून मान्यता देणे तसेच त्यावरील कार्यरत शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कौशल्य विकास विभागात होणाऱ्या संभाव्य शिक्षकीय संवर्ग पदभरतीपूर्वी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत कंत्राटी शिक्षकीय पदधारकांचे समायोजन करणे तसेच कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत कंत्राटी शिक्षकीय पदधारकांची पदे ही कंत्राटी स्वरुपाची असल्याने नियमित रिक्त पदावर त्यांचे समायोजन करता येत नाही.
(३) कंत्राटी निदेशकांच्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर एमआयडीसी (जि.पालघर) येथील रासायनिक कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात मृत्यूमुखी व जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(१२) * १५१४८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर एमआयडीसीतील प्लॉट नंबर डी १७ मधील भगेरिया इंडस्ट्रीज लिमिटेड या डाईज आणि डाईज इंटरमेडीएटसचे उत्पादन व एक्स्पोर्ट करणाऱ्या रासायनिक कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात ३ कामगार मृत्यूमुखी आणि १२ कामगार जखमी झाल्याची घटना दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्फोटाचा आवाज परिसरात ३ ते ४ कि.मी. अंतरावर ऐकू आला व ऑटोक्लेवचा काही भाग छताचे पत्रे फाडून दूरवर पडला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या दोषींवर, कंपनी व्यवस्थापनासह औद्योगिक सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच स्फोटात मृत्यूमुखी व जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत व वारंवार घडणारे अपघात रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.भगेरिया इंडस्ट्रीज लि.,प्लॉट नं.डी-१७, एमआयडीसी तारापूर,बोईसर ता.जि.पालघर या कारखान्यात दिनांक २६/१०/२०२२ रोजी स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू व १२ कामगार जखमी झाले आहेत.
(२) व (३) सदर प्रकरणाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

AC-०५ या ॲटोक्लेव्हमध्ये रसायनांच्या प्रक्रियेमुळे तयार झालेल्या ८ कि.ग्रॅ/चौ.से. मी. दाबामुळे बॉटम डिशचा तुकडा तुटून त्यातून तीव्र दाबाच्या वायुमुळे आवाज होऊन हा वायु दाबपात्राच्या खालच्या दिशेने बाहेर पडला. त्यामुळे हे दाबपात्र उर्ध्व दिशेने छताचा पत्र्याचा भाग तोडून,त्याच कारखान्यातील शेजारील इमारतीच्या छतावर जाऊन पडले असल्याचे निदर्शनास आले आहे.

चौकशीदरम्यान AC-०५ या दाबपात्राची जाडी रसायनाचा गंज लागून कमी झाल्यामुळे त्यातील रसायनांच्या प्रक्रियेमुळे तयार झालेला दाब सहन न केल्यामुळे ते फूटून दाबपात्राचा स्फोट झाल्याचे आढळून आले आहे.

सदर दुर्घटनेप्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे :-

१) कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७-A (२)(a) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ६५ (३)(iv) मधील तरतुदींनुसार कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा.न्यायदंडाधिकारी, पालघर यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

२) दाबपात्राची तपासणी करणाऱ्या सक्षम व्यक्तीचा (Competent Person) परवाना निलंबित करण्यात आला आहे.

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुध्दा तपसाणी केली असून, सदर कारखान्यातील गॅमा ॲसिड (Gamma Acid) चे उत्पादन बंद करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

४) बोईसर पोलीस ठाणे, ता.जि.पालघर यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद घेतली आहे.

कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७-A नुसार कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी कारखाना भोगवटादाराची असून, कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द विहित वेळेत कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.त्यामुळे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कारखाना व्यवस्थापनाने स्फोटात मृत झालेल्या ३ कामगारांच्या वारसांस नुकसान भरपाई देण्यासाठी कामगार न्यायालय, ठाणे येथे खालीलप्रमाणे रक्कम जमा केल्या आहेत.

१. राम गोपाल सिसोदिया- रुपये १५,५०,१७५/-

२. सिकंदर कुमार गोस्वामी- रुपये १८,८१,२७५/-

३. पंकज यादव- रुपये १९,७७,९५०/-

कारखाना व्यवस्थापन आणि कंत्राटदारामार्फत ३ मृत कामगारांच्या वारसांस रुपये १४,०२,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी देण्यात आली आहे.

तसेच व्यवस्थापनाने जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च रुपये १९,१६,११७/- इतका केला आहे.

कारखान्यात अशाप्रकारचे वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी कामगारांना प्रशिक्षण शिबीर व मॉक ड्रिल चे आयोजन करून औद्योगिक सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बोगस पॅथॉलॉजिस्टवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * १५७२४ डॉ.रणजित पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई येथील पॅथॉलॉजिस्ट लॅब मध्ये स्वतःच्या देखरेखीखाली वैद्यकीय तपासण्या करून उक्त वैद्यकीय अहवालावर स्वाक्षरी करण्याचा तसेच मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या एम.सी.आय. नियमांचे पालन न करता प्रत्यक्षात हजर नसताना बेकायदा प्रॅक्टीस करुन एकाच पॅथॉलॉजिस्टच्या नावे डिजिटल स्वाक्षरीचा वापर करून अनेक लॅब मध्ये तपासण्यांचे रिपोर्ट देण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्ष-किरण व विविध प्रकारच्या रक्त चाचण्या ह्या प्रयोगशाळांमध्ये कार्यरत असणारे तंत्रज्ञ हे नोंदणीकृत पॅथॉलॉजिस्टच्या मार्गदर्शनाखाली करत असून पॅथॉलॉजी विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या नोंदणीकृत पॅथॉलॉजिस्टने प्रयोग शाळांमधील अहवाल प्रमाणित करणे बंधनकारक असल्याचा आदेश माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला असतानाही राज्यात अनेक ठिकाणी पॅथॉलॉजिस्टच्या अनुपस्थितीत तंत्रज्ञ स्वतःच्या सहीने रुग्णांना अहवाल देतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस पॅथोलॉजी लॅबच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याकरीता शासन कायदा अंमलात आणणार असल्याची घोषणा तत्कालीन मा.आरोग्यमंत्री यानी दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कायदा आणण्यासाठी १८ सदस्यीय तज्ज्ञ समिती नेमण्यात येणार आहे काय, राज्यात २१६१ पॅथॉलॉजिस्ट उपलब्ध असतानाही बेकायदा लॅबचे प्रमाण वाढले असल्याची माहिती शासनाने सन २०२१ मध्ये दिली असून अशा पॅथॉलॉजिस्टवर कारवाई करण्यासंदर्भातला शासन निर्णय अद्यापही काढण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टीसींग पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट संघटनेने बेकायदा प्रयोग शाळांबाबत शासनाकडे तक्रारी केल्या असून अशा पॅथॉलॉजिस्टवर कारवाई करण्यासंदर्भातला शासन निर्णय काढण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बोगस पॅथॉलॉजिस्टवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

याबाबतच्या तक्रारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान या कार्यालसास प्राप्त झाल्या आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे आहे.

वैद्यकीय प्रयोगशाळेचे (मेडिकल लॅबोरेटरी) नियंत्रण व नियमन करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी दिनांक २९/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे आयुक्त, आरोग्य सेवा व संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्यात आलेली होती. तथापि, सदरच्या अहवालाच्या अनुषंगाने अधिकची माहिती आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून मागविण्यात आलेली आहे.
(६) सद्य:स्थितीत राज्यातील वैद्यकीय प्रयोगशाळा नोंदणीबाबत कोणताही कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे या प्रयोगशाळांची नोंदणी राज्यातील कोणत्याही आस्थापनेत होत नाही. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडून वैद्यकीय प्रयोगशाळेचे (मेडिकल लॅबोरेटरी) नियंत्रण व नियमन करण्यासंदर्भात प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने विचारणा केलेली अधिकची माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## शासकीय तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील जखमी खेळाडूंना शासनाकडून औषधोपचाराचा सर्व खर्च मिळणेबाबत

**(१४) * १५६५७ श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय क्रीडा स्पर्धा तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धा सुरु असताना एखादा खेळाडू जखमी झाल्यास त्याच्या औषधोपचाराचा सर्व खर्च शासनाकडून करण्याबाबत खेळाडूंकडून संबंधित विभागाकडे वारंवार मागणी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जखमी झालेल्या खेळाडूंच्या औषधोपचाराचा सर्व खर्च मोफत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

शासकीय स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंचा विमा राज्य सरकारने व विद्यापीठ स्पर्धांतील खेळाडूंचा विमा विद्यापीठाने उतरविणे या बाबतचे संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) याबाबत तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे चौंडी (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथील घाटाची जागा बदलण्याबाबत

**(१५) * १५७६५ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चौंडी (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असून ते ऐतिहासिक वारसा म्हणून जतन करून ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटन विकास योजनेंतर्गत सदर ठिकाणी सुरु असलेले बांधकाम हे समकालीन घाट सिनेश्वर व चोंडेश्वरी मंदिरासमोर असल्याने समाज बांधवांच्या भावनेचा प्रश्न निर्माण झाला असून सदरचे काम तात्काळ बंद करुन घाटाची जागा बदलण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यटन मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने घाट बांधकाम व संरक्षण भिंतीचे काम बंद करून घाटाची जागा बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर घाटाचे बांधकाम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान चौंडी येथील ऐतिहासिक वारसा म्हणून जतन करुन ठेवण्यात आलेल्या वास्तूची जागा अबाधित राखून बाहेरील बाजूस सीना नदी काठावरील समकालीन सिनेश्वर घाटाच्या बाजूच्या जागेत करण्यात येत आहे. सदर घाटाचे पायाचे खोदकाम पूर्ण असून Foundation चे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याबाबत

**(१६) * १५९४५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच ४३० खाटांचे रूग्णालय स्थापन करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाने सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आदेश जारी केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे काय, इमारत बांधकाम व प्रत्यक्षात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणे तसेच आगामी शैक्षणिक वर्षापासून प्रवेश प्रक्रिया याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून स्थापन करण्यासंदर्भातील अर्ज राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडे सादर करण्यात आलेला आहे.
निधीची तरतूद, इमारत बांधकाम इत्यादी बाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आशा सेविकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(१७) * १५१११ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.कपिल पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, प्रा.राम शिंदे : दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १४३६४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे दोन हजार आशा सेविकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांकरीता ७४ हजार आशा सेविकानी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुंबई येथील आझाद मैदानात आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आशा सेविका व गटप्रवर्तक यांचे वेतन वाढविण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र आशा वर्कर्स, गटप्रवर्तक व आरोग्य कर्मचारी संघटना (आयटक) यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोविड काळात आरोग्य सेना म्हणून राबलेल्या राज्यातील आशा वर्कर्सना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आशा वर्कर्स, सुपरवायझर्स आणि अन्य आरोग्य कर्मचारी यांना शासकीय सेवेत नियमित करणे,

आरोग्य सुविधा पुरविणे, किमान वेतन देणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या अटी, शर्ती व सवलती लागू करणे इत्यादी मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक यांची नियुक्ती कामावर आधारित मोबदला या तत्वावर करण्यात येते. तसेच अन्य आरोग्य कर्मचारी यांची नियुक्ती ११ महिन्यांकरीता कंत्राटी स्वरुपाची आहे. त्यामुळे आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक व अन्य आरोग्य कर्मचारी यांना शासकीय सेवेत नियमित करणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या अटी, शर्ती व सवलती लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यातील बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने बालकांची पोषणस्थिती तपासून उपाययोजना करण्याबाबत

**(१८) * १६२७० श्री.आमश्या पाडवी, श्री.जयंत पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध जिल्ह्यात शासनाकडून लाखो रूपये खर्च करून ग्रामीण भागातील मुलांना पोषण आहार दिला जात असून त्याचा दर्जा अतिशय निकृष्ट असून, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात ७९५ बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी ८५ बालके मृत्यूशी झुंज देत आहेत तर माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये कुपोषणामुळे ७ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गर्भवती आणि स्तनदा मातांसाठी असलेल्या अमृत आहार योजनेसाठी धान्य विकत घेऊन या मातांना अंगणवाडी सेविका, मदतनीसांमार्फत ३५ रूपयांत जेवण देण्यात येत होते, परंतु वाढत्या महागाईमुळे त्यांना परिपूर्ण आहार मिळत नसल्यामुळे शहापूर तालुक्यात कुपोषित बालकांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुपोषण कमी होण्याकरीता मुलांना अंगणवाडीच्या माध्यमातून पोषक आहार देण्याची योजना राबविण्यात येत असताना अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आदिवासी भागातील मदतनीसांची हजारो पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात ० ते ५ वयोगटातील १०६३ बालमृत्युंची नोंद झाली असून यामध्ये १७९ आदिवासी बालकांचा समावेश असून या बालमृत्यूमागे कुपोषणामुळे निर्माण होणाऱ्या आजारांचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बालमृत्यू रोखण्यासाठी राज्यातील बालकांची पोषण स्थिती तपासून उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यामध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी, गरोदर महिला व स्तनदा माता यांना नियमित घरपोच आहार पुरवठा करण्यात येतो. तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष या वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहार नियमितपणे पुरविण्यात येतो.

ठाणे जिल्ह्याची माहे सप्टेंबर, २०२२ ची पोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| जिल्हा | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कुपोषित बालके | तीव्र कुपोषित बालके |
|---|---|---|---|---|
| ठाणे | २५८२०८ | २३३०३७ | २२२५५ | २९१६ |

ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुक्यात माहे जुलै,२०२२ मध्ये तीव्र कुपोषित बालकांची संख्या ८५ तर मध्यम कुपोषित बालकांची संख्या ७१० इतकी होती. तर माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये तीव्र कुपोषित बालकांची संख्या ८२ तर मध्यम कुपोषित बालकांची संख्या ६७४ इतकी होती.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये ५ बालमृत्यू झाले आहेत. सदर बालमृत्यू अनुक्रमे न्यूमोनिया, अननोन बाईट, कॅन्सर, ताप व न्यूमोनिया या कारणांमुळे झालेले आहेत.

(२) हे खरे नाही.

अमृत आहार योजनेंतर्गत अंगणवाडी सेविकांमार्फत वितरीत केला जाणारा आहार वाढत्या महागाईमुळे तयार करण्यास अडचणी येत असल्याबाबत अंगणवाडी सेविका संघटनेमार्फत दरवाढीबाबतचे निवेदन प्राप्त झाले होते. अमृत आहार योजनेंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या आहाराच्या दरवाढी बाबतचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागास सादर करण्यात आला आहे. अमृत आहार योजनेंतर्गत गर्भवती आणि स्तनदा मातांना दिला जाणारा आहार हा चौरस व परिपूर्ण असून त्याचा पुरवठा नियमित सुरू आहे.

(३) अंशतः खरे आहे.

ठाणे जिल्ह्यात सद्य:स्थितीत अंगणवाडी सेविकांची १२६ पदे, मदतनिसांची १३० पदे आणि मिनी अंगणवाडी सेविकांची १८ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार राज्यात ० ते ६ वयोगटातील १०६३ बालमृत्यूंची नोंद झाली असून हे बालमृत्यू वेगवेगळया आजाराने उदा. न्यूमोनिया, डायरीया, श्वसन नलिकेसंबंधी आजार, जंतू संसर्ग, गोवर यासारख्या आजाराने झालेले आहेत.

(५) प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना THR व ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच आदिवासी प्रकल्पांमध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून सदर योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी/केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत. इत्यादी.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१९) * १५५५३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १४२०२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या सन २०१९-२१ च्या अहवालानुसार, गत ३ वर्षात राज्यात बालविवाहाला बळी पडलेल्यांची संख्या ८२ पेक्षा अधिक असल्याचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालविवाह रोखण्यासाठी केंद्र शासनाचा बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कार्यान्वित असून राज्याने महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम २००८ तयार केले असून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील बालविवाह रोखण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यात बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ च्या अनुषंगाने महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम २००८ प्रसिध्द केलेले आहे. तसेच सदर नियमांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ प्रसिध्द करण्यात आले आहेत.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायती मधील ग्रामसेवकांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच नागरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे.
(३) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार पोलीस विभागाकडे गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत बालविवाहाचे निर्मूलन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष, स्वयंसेवी संस्था आणि चाईल्ड लाईन यांच्या माध्यमातून बालविवाह रोखण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील बंद असलेली अस्मिता योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(२०) * १५६१३ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील शिक्षण घेणाऱ्या किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकिन देण्याकरीता अस्मिता योजना सुरू करण्यात येवूनही गत ६ महिन्यांपासून सदर योजना बंद असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना बंद झाल्याने ग्रामीण भागातील महिला व मुलींना 'सॅनिटरी नॅपकीन' विकत घ्यावे लागत असल्याने आर्थिक समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ग्रामीण भागातील महिला आणि किशोरवयीन मुलींच्या निरोगी आरोग्यासाठी बंद पडलेली अस्मिता योजना पुन:श्च सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२), (३) व (४) अस्मिता योजनेंतर्गत महिला व मुलींना सॅनिटरी नॅपकिन हे मोफत स्वरुपात देण्यात येत नसून माफक दरात उपलब्ध करुन देण्यात येतात.

अस्मिता योजनेच्या अंमलबजावणीकरीता उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असून अस्मिता प्लस सॅनिटरी नॅपकिन पुरवठा करण्यासाठी पुरवठादार यांची ई-निविदेद्वारे निवड करण्यात आलेली होती. तथापि, पुरवठादार यांचा सॅनिटरी नॅपकिन पुरवठा करण्याचा करार कालावधी हा माहे मार्च, २०२२ मध्ये संपुष्टात आलेला आहे. अस्मिता योजनेची व्याप्ती, स्वरुप, पुरवठादार निवड, Logistic इत्यादीबाबत सुधारणा करणे आवश्यक असल्याने योजनेच्या सुधारित अंमलबजावणीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील शहरी भागातील अंगणवाड्यांचे भाडे नियमित देणेबाबत

**(२१) * १५४७५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शहरी भागातील काही ठिकाणी अंगणवाड्यांचे गेली ६ ते १० महिन्यांचे भाडे थकल्याने घरमालक अंगणवाडी सेविकांकडे थकीत भाड्याची मागणी करीत असून, अनेक अंगणवाडी सेविका अंगणवाड्या बंद पडू नयेत म्हणून स्वत: आर्थिक अडचणींचा सामना करुन स्वत:चे आर्थिक नुकसान होऊनही भाडे भरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडीच्या भाड्यासाठी केंद्र आणि राज्य शासन मिळून दरमहा फक्त ७५० रुपये देत असून यात केंद्र शासनाचा ६० टक्के तर राज्य शासनाचा ४० टक्के वाटा असून अंगणवाड्यांवर एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे नियंत्रण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या नागरी भागात सुमारे १०५ शहरी प्रकल्प असून महानगरातील वाढते शहरीकरण, जागांचे वाढणारे दर यामुळे अंगणवाडयांना शासनाच्या अत्यंत अल्प भाड्यात जागा मिळणे दुरापास्त झाले असून शहरातील अंगणवाडी प्रकल्पापुढे अस्तित्वाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने अंगणवाड्यांच्या जागांसाठी नवीन निकष ठरवले आहेत काय, त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अंगणवाड्यांचे भाडे नियमित देणे व घरभाड्यात वाढ करणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) केंद्र पुरस्कृत योजनांकरीता निधी वितरणाची कार्यवाही SNA प्रणालीमार्फ़त करावयाची असल्याने माहे एप्रिल, २०२२ पासून अंगणवाडी भाडे थकीत राहिलेले आहे.
(२), (३), (४) व (५) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्राचे भाडेकरीता केंद्र व राज्य हिस्सा याचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र शासनाने अंगणवाडी केंद्रांच्या भाड्यामध्ये केलेल्या वाढीनुसार शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०२० अन्वये अंगणवाडी केंद्रांच्या भाड्यामध्ये वाढ करण्यास मंजूरी देण्यात आली असून त्यानुसार ग्रामीण व आदिवासी क्षेत्राकरीता प्रतिमाह रुपये १०००/, नगरपालिका, नगपरिषद व महानगरपालिका (महानगर वगळून) याकरीता प्रतिमाह रुपये ४०००/- व महानगर क्षेत्राकरीता (मुंबई शहर व उपनगर) प्रतिमाह रुपये ६०००/- याप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यात १०४ नागरी प्रकल्प आहेत.

केंद्र शासनाने SNA (Single Nodal Agency) प्रणाली सुरू करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार अंगणवाडी केंद्र भाडे SNA प्रणालीमार्फत अदा करणे आवश्यक आहे. SNA कार्यपध्दतीनुसार प्रथमतः राज्यस्तरावर Single Nodal Account उघडणे, तसेच जिल्हास्तर व प्रकल्प स्तरावर योजनानिहाय स्वतंत्र Account उघडणे, अंगणवाडी केंद्र इमारत भाडेतत्वावर देणाऱ्या घरमालकांचे PFMS पोर्टलवर Vendor Registration करणे, त्याकरीता आवश्यक कागदपत्रे (नाव, बॅंक खाते क्रमांक, आधार कार्ड, पॅन कार्ड, ई- मेल आयडी इ.) संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच घरमालकांचे बँक खाते SNA प्रणालीमध्ये मॅप करणे इ. प्रक्रिया पार पाडावी लागत असल्याने त्यास काही कालावधी लागत आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत सर्वसाधारण सेवांकरीता निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी अंगणवाडी भाडे देयकांकरीता रुपये १५ कोटी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. विभागीय उपायुक्त (महिला व बालविकास) यांचेमार्फत नागरी प्रकल्पांचे अंगणवाडी भाडे अदा करणेसाठी वित्तीय मर्यादा (Limit Set) निश्चित करण्यासाठी प्रस्ताव येत आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून २४ तासाच्या आत पारित करुन आयुक्तालय स्तरावरुन Limit Set करुन देण्यात येत आहे. त्यानुषंगाने अंगणवाडी केंद्रांचे भाडे अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## जामनेर (जि.जळगाव) येथे जिल्हा परिषदेच्या मालकीच्या भूखंडावर गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * १६१६१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनेर (जि.जळगाव) येथे जिल्हा परिषदेच्या मालकीच्या भूखंडावर बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर व्यापारी संकुल बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी व श्री.विजय भास्कर यांनी दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी ॲड. विजय पाटील यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २३ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार चौकशी समिती गठीत केली. तथापि, चौकशी समितीचा अहवाल अद्यापही अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोचाई-बोरमाळ ग्रुप ग्रामपंचायत (ता.तलासरी, जि.पालघर) अंतर्गत बोरमाळ भेंडीपाडा येथील नदीवरील पुलाअभावी ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याबाबत

**(२३) * १६३५६ श्री.सचिन अहिर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोचाई-बोरमाळ ग्रुप ग्रामपंचायत (ता.तलासरी. जि.पालघर) अंतर्गत येणाऱ्या बोरमाळ गावातील भेंडीपाडा, पारसपाडा या गावपाड्यात सुमारे ६०० ते ६५० एवढी लोकवस्ती असून सदर पाड्यातील मृत्यू पावलेल्या नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी उपलाट बोरमाळ आणि उपलाट गावांतील नदी ओलांडून स्मशानभूमीकडे जावे लागत असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोरमाळ भेंडीपाडा येथील नदीपर्यंत डांबरी रस्ता तसेच दुसऱ्या बाजुला उपलाट जांबीपाडा ते पदापर्यंत डांबरी रस्ता असून नदीच्या दोन्ही बाजुला सुमारे सहा ते सात वर्षापूर्वी डांबरी रस्ता असूनही पूल नसल्यामुळे नागरिकांना बोरमाळ गावात पाण्यातूनच अंत्ययात्रा न्यावी लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील नदीवर पूल बांधण्यात यावा, अशी मागणी गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी, पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तलासरी यांना अनेकदा लेखी निवेदने देऊनही अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे. हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उपलाट बोरमाळ नदीवर पूल बांधण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

तथापि, बोरमाळ या गावासाठी स्वतंत्र स्मशानभूमी अस्तित्वात असून सदर स्मशानभूमीकडे जाण्यासाठी नदी ओलांडावी लागत नाही.
(२) बोरमाळ गावासाठी स्वतंत्र स्मशानभूमी अस्तित्वात असतानाही बोरमाळ ग्रामस्थांनी दरोठा नदी ओलांडून मोकळया जागेत अंत्यसंस्कार केले आहेत.
(३) व (४) बोरमाळ भेंडीपाडा ते उपलाट जांबीपाडा रस्त्याचा नुकताच रस्ते विकास आराखड्यात समावेश झाला असून सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.३२१ या दर्जाचा झालेला आहे. सदर रस्त्यावरील नदीवर नवीन पुलाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने आदिवासी विकास विभागास सादर केला असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२४) * १६३९६ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून प्राथमिक औषधेही रुग्णालयात मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असलेल्या औषधांच्या साठयांवर नियंत्रण देखरेखीसाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असूनही सर जे.जे. रुग्णालयात मोठ्या प्रमाणात औषध टंचाई निर्माण होत असून रुग्णांना प्राथमिक औषधे बाहेरुन घ्यावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर जे.जे. रुग्णालयात येणारे बहुतांश रुग्ण आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील असतानाही त्यांना सर्व आवश्यक असणाऱ्या औषधांचा पुरेसा साठा रुग्णालयात न ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उक्त रुग्णालयातील रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे सदर रुग्णालयातच उपलब्ध व्हावी यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२) व (३) नाही, तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार आवश्यक ओषधे व सर्जिकल्स साहित्याची खरेदी हाफकिन महामंडळामार्फत करून संस्थांना पुरवठा करण्यात येतो. अत्यावश्यक औषधांच्या साठ्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याकरीता रुग्णालयात तीन सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीच्या शिफारशीनुसार रुग्णालयात लागणाऱ्या अत्यावश्यक व प्राथमिक औषधे रुग्णांकरीता उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नोंदणी करुन रुग्णांना उपचाराकरीता लागणारे सर्व औषधी बाबी पुरविण्यात येतात. सर ज.जी. समूह रुग्णालयास सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात औषधे व सर्जिकल्स साहित्यांची खरेदी करण्यासाठी रुपये २४.३१ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. याव्यतिरिक्त स्थानिक स्तरावर महात्मा फुले जन आरोग्य योजना, सीएसआर फंड, पीएलए खात्यातून तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध निधीमधून तातडीची व आवश्यक खरेदी करुन रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करंजी (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील खंडोबावाडी येथे बोगस डॉक्टरने रुग्णांना जनावरांची औषधे दिल्याबाबत

**(२५) * १६४७० श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील खंडोबावाडी येथे बोगस डॉक्टराने ३० ते ३५ रुग्णांना जनावरांची औषधे दिल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त डॉक्टराची चिठ्ठी करंजी येथील औषध विक्रेत्यांकडे देऊन औषधांची मागणी केली असता दुकानदाराने ही औषधे जनावरांची असल्याचे निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बोगस डॉक्टरांवर कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, तिसगावं (जि.अहमनगर) यांनी बोगस डॉक्टर श्री.राजेंद्र जंजाळ यांच्याविरुध्द पाथर्डी पोलीस ठाणे, जि.अहमदनगर येथे वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३ व ३६ अंतर्गत गु.र.नं.८७८/२०२२ संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीसांमार्फत तपास सुरु आहे.

तसेच बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी व त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या दिनांक ०७/०२/२००२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५/१२/२००१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच दिनांक ०५/०९/१९९१ च्या शासन निर्णयान्वये तालुका स्तरीय, महानगरपालिका स्तरीय व नगरपरिषद स्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांना व पोलीसांना बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत दिनांक ०७/०२/२००० व दिनांक १९/०८/२००० च्या परिपत्रकान्वये तसेच दिनांक १५/१२/२०२१ च्या शासनपत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. या समित्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन त्यांच्याविरुध्द संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची रितसर कारवाई पोलिसांमार्फत करतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे.मुथा इंजिनअरींग प्रा.लि. (म.औ.वि.म.) सातारा येथील कामगारांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) * १६६७६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुथा इंजिनिअरींग प्रा.लि. (जि.सातारा) यांचे एमआयडीसी, सातारा येथे पाच कारखाने असून सदर कारखान्यात १,२५० कंत्राटी कामगार अत्यंत अल्प वेतनावर वर्षानुवर्षे काम करीत असून कामगार कायद्यानुसार देय असलेल्या बोनस व ग्रॅच्यूईटी व अन्य सोयी सुविधा देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी कामगारांना कामगार कायद्यानुसार देय असलेल्या सोयी-सुविधा अदा करण्याबाबत युनियनच्या वतीने दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.कामगार मंत्री यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त कामगारांना कामगार कायद्यानुसार देय असलेल्या सर्व सोयी सुविधा मिळाव्यात यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.मुथा इंजिनिअरींग प्रा.लि. या आस्थापनेचे एकूण पाच युनिट एम.आय.डी.सी. सातारा येथे कार्यरत असून १५ कंत्राटदारामार्फत १२२० कंत्राटी कामगार आस्थापनेत काम करीत आहेत.

कामगार संघटनेमार्फत सभासद कामगारांना बोनस व ग्रॅच्युईटी व अन्य सोयीसुविधा मिळत नसलेबाबत सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा कार्यालयास तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियन, सातारा यांनी मे. मुथा इंजिनिअरींग प्रा.लि. एच-२१ या आस्थापनेच्या युनिटमधील सभासद कामगारांच्या पगार वाढ व इतर सेवा शर्तीबाबत मध्यस्थी करणेबाबत दिनांक २८/१२/२०२१ रोजीच्या पत्राने सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा कार्यालयास मागणी केलेली होती.

त्यानुषंगाने सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा कार्यालयामार्फत उभयपक्षांच्या दिनांक ११/०२/२०२२ ते दिनांक ३०/०६/२०२२ या कालावधीत वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर विवादाच्या अनुषंगाने व्यवस्थापनेस चर्चेद्वारे मार्ग काढण्याकरीता वेळोवेळी सूचित करण्यात येवून सहाय्यक कामगार आयुक्त, सातारा कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर विवादाबाबत उभयतांमध्ये कोणतेही यशस्वी/ सकारात्मक चर्चा होवू शकली नाही. त्यानुषंगाने कामगार व कामगार संघटना यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचे चालू असलेले प्रकरण बंद करण्यात यावे. त्या अनुषंगाने दिनांक ३०/०६/२०२२ रोजी कामगारांच्या मागणीनुसार सदर प्रकरण बंद करण्यात आलेले आहे.

संघटनेचे तक्रारीनुसार मे. मुथा इंजिनिअरींग प्रा.लि., एच-२१, एम.आय.डी.सी., सातारा या आस्थापनेमध्ये सरकारी कामगार अधिकारी, सातारा यांनी सदर आस्थापनेमध्ये विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारीत करण्यात आलेले आहे. सदर निरीक्षण शेऱ्यात आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गोवर साथीचा उद्रेक रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२७) * १६७१४ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये ० ते ५ वर्षापर्यंतच्या बालकांमध्ये गोवर/ रुबेला ह्या संसर्गजन्य आजाराची साथ मोठ्या प्रमाणात पसरली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पहिल्या वा दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गोवंडीसह राज्यातील मालेगाव, भिवंडी येथे मोठ्या प्रमाणावर झालेल्या गोवराच्या उद्रेकात आजमितीपर्यंत सात मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात किती बालकांना या आजाराची लागण झाली आहे व किती बालके मृत्यू पावली आहेत तसेच या पार्श्वभूमीवर मुंबईत केंद्रीय आरोग्य पथक निर्माण करण्यात आले आहे काय, तसेच सदर पथकाद्वारे विविध रुग्णालयांमध्ये आणि वस्त्यांमध्ये रुग्णांची पाहणी सुरू आहे आहे काय, तसेच सदर पथकाने उक्त साथीच्या आजारांबाबत कोणते अभिप्राय दिले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात तसेच मुंबई शहरामध्ये गोवर, रुबेला या साथीच्या आजाराबाबत सर्वेक्षण करुन साथीचा उद्रेक रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहे नोव्हेंबर २०२२ च्या पहिल्या व दुसऱ्या सप्ताहात गोवर आजाराचे उद्रेक झाल्याचे आढळून आले.

दिनांक ५ डिसेंबर, २०२२ अखेर मुंबई शहरात गोवर आजाराचे ४६ उद्रेक झाले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

- मुंबई शहरात दिनांक ५ डिसेंबर २०२२ अखेर गोवर आजाराचे ४६ उद्रेक झाले आहेत. त्यामध्ये ३६५० संशयीत रुग्णांपैकी ४०५ रुग्ण हे गोवर बाधित असल्याचे आढळून आलेले आहे.
- केंद्र शासनाच्या दिनांक ११ ते १४ नोव्हेंबर या कालवधीत मुंबई शहरातील उद्रेकग्रस्त भागात तसेच रुग्णालयांमध्ये भेट दिली आहे. सदर पथकाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहे

१) अतिरिक्त मनुष्यबळाद्वारे जलद रुग्ण सर्वेक्षण.

२) विशेष लसीकरण सत्राद्वारे लसीकरण राहिलेल्या बालकांचे लसीकरण करणे.

३) अपात्कालीन परिस्थितीसाठी मोबाईल वाहन उपलब्ध करणे.

४) जनतेमध्ये गोवर आजार व लसीकरणाचे महत्व याबाबत जनजागृती करणे.

५) खाजगी वैद्यकिय व्यवसायिकांचे गोवर प्रतिबंधक उपाययोजनासाठी त्यांचे प्रबोधन करणे.

६) गोवर आजाराच्या रुग्णांना आवश्यकतेनुसार संदर्भित करण्यासाठी संदर्भसेवा रुग्णालय निश्चित करुन त्याठिकाणी मनुष्यबळ साहित्य सामुग्री उपलब्ध करणे.

७) विविध संघटना व मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये नियमित बैठका घेऊन समन्वय साधणे.

(४) राज्यात तसेच मुंबई शहरामध्ये गोवर आजाराचा उद्रेक रोखण्यासाठी -

- गोवर प्रतिबंधक उपचार व मार्गदर्शन यासाठी राज्य टास्क फोर्सची बैठक आणि आंतरविभागीय समन्वय
- कुपोषित बालकांची माहिती घेऊन त्यांच्यावर विशेष लक्षउपचारात्मक पोषण, जीवनसत्व अ आणि गोवर लसीकरण.

त्याचप्रमाणे गोवर आजाराचा उद्रेक खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जात आहेत.

१) घरोघरी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पथकाद्वारे गोवर रुग्णांचे सर्वेक्षण - आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्ती यांच्या पथकाद्वारे घरोघरी जाऊन ताप, पुरळ, सर्दी किंवा खोकला, डोळे लाल होणे इ. लक्षणे असलेल्या रुग्णाचे सर्वेक्षण.

२) जीवनसत्व अ ची पुरक मात्रा - संशयित रुग्णांना जीवनसत्व अ च्या दोन मात्रा २४ तासाच्या अंतराने देण्यात येतात.

३) गोवर रुबेला लसीचा डोस - ५ वर्षाखालील ज्या बालकांचा पहिला किंवा दुसरा गोवर रुबेला लसीचा पहिला किंवा दुसरा डोस राहिला असेल अशा बालकांना गोवर रुबेला लसीचे डोस.

४) अतिरिक्त गोवर रुबेला लसीचा डोस - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार ६ महिने ते ९ महिने वयाच्या बालकांना झिरो डोस व ९ महिने ते ५ वर्षापर्यंतच्या बालकांना गोवर रुबेला लसीचा एक अतिरीक्त डोस.

५) गोवर गुंतागुंतीचे रुग्णांवर उपचार गंभीर अथवा गुंतागुंतीच्या रुग्णांना अंतररुग्ण सेवेसाठी नजीकच्या रुग्णालयात संदर्भ सेवा उपलब्धता.

६) वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण -गोवर आजारासंदर्भात सर्वेक्षण, लक्षणे व उपचार, लसीकरण याबाबत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण.

७) खाजगी वैद्यकीय व्यवसायिक तसेच युनानी डॉक्टर्स यांच्या कार्यशाळेचे आयोजन करुन गोवर आजार रुग्ण शोध व गोवर रुबेला लसीकरणामध्ये सहकार्य करण्याबाबतचे आवाहन.

८) स्थानिक मौलाना तसेच धर्मगुरु आणि स्थानिक प्रभावी व्यक्तींच्या बैठकांचे आयोजन.

९) आरोग्य शिक्षण व प्रसिध्दी.

- जनतेत गोवर आजाराबाबत माहिती होण्यासाठी तसेच जनतेत लसीकरणाबाबत जागृकता निर्माण करण्यासाठी विविध माध्यमाद्वारे प्रसिध्दी देऊन आरोग्य शिक्षण
- घरभेटीद्वारे वैयक्तिक संपर्क साधून बालकांच्या पालकांना आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे.
- रिक्षाद्वारे मायकिंग तसेच पोस्टर्स व बॅनर्सचा वापर.

१०) राज्यस्तरीय तसेच केंद्र शासन स्तरीय पथकाद्वारे उद्रेकग्रस्त भागात भेटी व आढावा – केंद्र शासन स्तरावरुन तसेच राज्यस्तरावरुन पथकाद्वारे उद्रेकग्रस्त भागात भेट देऊन गोवर साथी संदर्भात आढावा व मार्गदर्शन.

११) शासन स्तरावरुन नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाड्यांना इमारत उभारुन देण्याबाबत

**(२८) * १६७६७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बालविकास विभागातर्फे एकूण मंजूर व कार्यरत असलेल्या अंगणवाडयांना महिला व बालविकास विभागाची इमारत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या अंगणवाडीची स्वतःची इमारत नसल्यामुळे ० ते ६ वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता आदी लाभार्थ्यांची गैरसोय असून महिला व बालविकास विभागाची स्वतंत्र इमारत प्रत्येक अंगणवाडीला उपलब्ध व्हावी यासाठी कालबध्द नियोयजन करुन कोणती धोरणात्मक कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय ३१/०१/२०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत किमान ३ % निधी राखीव ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला व बालविकास विभागातंर्गत राज्यात किती अंगणवाडयांना कार्यरत आहेत या पैकी किती अंगणवाडी इमारतींना मीटर नसल्याकारणाने/ विद्युत देयक वेळेवर न भरल्याने/ विजेची पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने इ. कारणामुळे विद्युत पुरवठा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंगणवाडयांना नियमित विद्युत पुरवठा न केला गेल्याने शासनाचे ई-लर्निंग/ स्मार्ट अंगणवाडी यासारखे पथदर्शी प्रकल्प राबविताना समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील अंगणवाड्यांना महिला बालविकास विभागाची अंगणवाडीची स्वत:ची इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा तसेच, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना विद्युत पुरवठा उपलब्ध करण्याचा दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यात एकूण ९७४७५ अंगणवाडी केंद्र तसेच १३०११ मिनी अंगणवाडी केंद्र असे एकूण ११०४८६ अंगणवाडी केंद्र मंजूर असून त्यापैकी ९७४७५ अंगणवाडी केंद्र व १२९७१ मिनी अंगणवाडी केंद्र असे एकूण ११०४४६ इतकी अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

| क्षेत्र | कार्यरत एकूण अंगणवाड्यांची संख्या | स्वत:च्या इमारतीतील अंगणवाडी केंद्र संख्या | भाड्याच्या इमारतीतील अंगणवाडी केंद्र संख्या | इतर इमारतीत (समाज मंदिर, वाचनालय, शाळा इत्यादी) |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण व आदिवासी | ८१८७५ | ६४८२७ | ८००० | ९०४८ |
| नागरी | १५६०० | ३२७ | १३६०९ | १६६४ |
| एकूण | ९७४७५ | ६५१५४ | २१६०९ | १०७१२ |

वरीलप्रमाणे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यात ६५१५४ अंगणवाडीला केंद्रांना स्वत:ची इमारत आहे. उर्वरित २१६०९ अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीत तसेच १०७१२ अंगणवाडी केंद्र हे इतर इमारतीत चालविण्यात येत आहेत. तसेच मिनी अंगणवाडी केंद्रांचा बांधकाम आराखडा नसल्याने बहुतांश मिनी अंगणवाडी केंद्र शाळेच्या इमारतीत, समाज मंदिर, भाड्याच्या इमारतीत इ. ठिकाणी चालविण्यात येत असून त्याद्वारे संबंधित लाभार्थ्यांना सेवा नियमित देण्यात येत आहेत.

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/०१/२०२२ अन्वये महिला व बालविकास सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत किमान ३% इतका निधी कायम स्वरूपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये नवीन अंगणवाडी बांधकाम करण्याचे प्रावधान आहे.

(४), (५) व (६) अंगणवाडी केंद्र इमारतींना वीज जोडणी करणे तसेच विद्युत देयक अदा करणे या बाबींकरीता केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नाही. ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडी केंद्राकरीता स्थानिक ग्रामपंचायत यांचेकडून विद्युत जोडणी तसेच वीज देयक अदा करण्यात येते. ज्या इमारतींना विद्युत जोडणी आहे, अशाच इमारती अंगणवाडी केंद्र चालविण्यासाठी भाडेतत्वावर घेण्यात येतात.

तसेच स्मार्ट अंगणवाडी या योजनेमध्ये सोलर विद्युत व्यवस्था ही बाब अंतर्भूत आहे. बहुतांशी अंगणवाडी केंद्रांना विद्युत सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे ई लर्निंग / स्मार्ट अंगणवाडी यासारखे पथदर्शी प्रकल्प राबविताना अडचणी निर्माण होत नाहीत.

त्याचप्रमाणे महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/०१/२०२२ अन्वये महिला व बालविकास सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत किमान ३% इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये नवीन अंगणवाडी बांधकाम तसेच अंगणवाडी केंद्रांना वीजपुरवठा करणे याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२९) * १६१४२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, दंतचिकित्सा महाविद्यालयात माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर अधिष्ठाता, शिक्षक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या मंजूर असलेल्या पदांपैकी अनेक पदे रिक्त असून राज्यात २२ वैद्यकीय महाविद्यालये असून प्राध्यापकांसह कर्मचाऱ्यांच्या किमान ५५०० म्हणजे ६० टक्के जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद तसेच इतर काही आयुर्वेद महाविद्यालयात शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय परिषदेने प्रवेशबंदी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी आणि रत्नागिरी येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु होत असून प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यासुमारास शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ४९० पैकी १६६ प्राध्यापकांची पदे तसेच सहयोगी प्राध्यापकांची २०६, सहायक प्राध्यापकांची ८२४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्राध्यापकांची रिक्त पदे अधिक प्रमाणात असताना प्राध्यापकांना इतर वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वैद्यकीय शिक्षण विभागातील रिक्त जागा भरणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

काही प्रमाणात पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मात्र भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक २१/११/२०२२ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या प्रवेश प्रक्रियेस मान्यता दिली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्राध्यापक संवर्गात १०५, सहयोगी प्राध्यापक संवर्गात १५६ व सहायक प्राध्यापक संवर्गात ७९७ पदे रिक्त आहेत.

(५) अंशत: खरे आहे.

(६) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या संवर्गात सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या अनुषंगाने एकूण १२०१ पदांचे मागणीपत्र आयोगास पाठविण्यात आले. त्यापैकी २१५ अध्यापकांना पदस्थापना देण्यात आली असून १५९ अध्यापकांना पदस्थापना प्रस्तावित आहे. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांबाबत प्राध्यापक-१३३ व सहयोगी प्राध्यापक-१८३ पदांचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला. सामान्य प्रशासन विभागाने शिफारस केलेल्या प्राध्यापक-१०५ व सहयोगी प्राध्यापक-१५३ जणांना पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सरळसेवेची गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २१/११/२०२२ नुसार या विभागाने पदभरतीची प्रक्रिया राबविण्यासाठी टि.सी.एस. या कंपनीची निवड केली आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ नुसार गट-ड संवर्गातील पदे जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत भरण्यात येणार असून त्यानुषंगाने सर्व अधिष्ठातांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३०) * १५३५६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असून सदर रुग्णालय १०० खाटाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आरोग्य विभागाने दिनांक ३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेवराई तालुक्यात एकच उपजिल्हा रुग्णालय असून ओपीडी/आयपीडीची दैनंदिन संख्या ४५० ते ५०० आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालय हे राष्ट्रीय महामार्ग-२११ धुळे-सोलापूर रोड लगत असल्याने रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गेवराई (जि.बीड) येथील उपजिल्हा रुग्णालय ५० वरुन १०० खाटांचे श्रेणीवर्धन करुन १०० खाटांप्रमाणे मनुष्यबळ, औषधी, साहित्य व इतर भौतिक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) उपजिल्हा रुग्णालय गेवराई, जि.बीडचे ५० वरुन १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव दिनांक २४/११/२०२२ अन्वये मागविण्यात आला हे खरे आहे,

(२) व (३) अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय गेवराई हे राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ धुळे ते सोलापूर वर असून सदर रुग्णांच्या संख्येत मागील वर्षाच्या तुलनेत फार वाढ झालेली नाही.

(४) उपजिल्हा रुग्णालय गेवराई (बीड)चे ५० वरुन १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर इतर अनुषंगिक बाबींवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चौसाळा (जि.बीड) येथील मांजरा नदीवर पूल उभारण्याबाबत

**(३१) * १५३९७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौसाळा (जि.बीड) येथील पाच कि.मी.अंतरावर असलेल्या मांजरा नदीवर पूल नसल्यामुळे मुंडे वस्ती आणि आंधळे वस्तीतील लहान मुलांना, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, रूग्णांना तसेच दैनंदिन कामकाजासाठी ग्रामस्थांना हिंगणी खुर्दमध्ये ये-जा करण्यासाठी बाराही महिने नदीच्या पाण्यातून प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मांजरा नदीवर पूल नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात मुंडे वस्ती व आंधळे वस्ती येथे राहणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना हिंगणी व चौसाळा येथे तसेच शेतकऱ्यांना शेतात तीन ते चार महिने जाता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मुंडे वस्ती व आंधळे वस्ती येथील विद्यार्थ्यांना तसेच ग्रामस्थांना सोयीस्कर प्रवास करण्यासाठी मांजरा नदीवर पूल बांधण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी मांजरा नदीवर नवीन पूल बांधणे आवश्यक असून सदर पूलाचे काम नवीन पूल बांधकामाच्या योजनांमध्ये (उदा. नाबार्ड, जिल्हा वार्षिक योजना, इ.) प्रस्तावित करण्याबाबतच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऐना ग्रामपंचायत (ता.जव्हार, जि.पालघर) येथील नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा मिळण्याबाबत

**(३२) * १५१०३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण भाग असणाऱ्या ऐना ग्रामपंचायत हददीतील मनमोहाडी गावातील २१ वर्षीय गरोदर आदिवासी महिलेची ग्रामीण उपरुग्णालय नसल्यामुळे जंगलमार्गे रुग्णालयात जात असताना रस्त्याच्या अभावी जंगलातच प्रसुती झाल्याची घटना दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच किलोमीटरचा प्रवास डोलीतून करून माता व बालकाला संबंधित महिलेच्या नातेवाईकांनी जव्हार येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुर्गम परिसरात वास्तव्य करीत असलेल्या वृध्द नागरिकांना, गर्भवती महिलांना, नवजात बालके, सर्पदंश झालेल्या व्यक्तीना रस्त्याअभावी वेळीच उपचार न मिळाल्याने प्राण गमावल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रस्त्यासाठी दोन वर्षापासून पाठपुरावा करुनही वन विभागाची परवानगी नसल्यामुळे निधी दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ग्रामपंचायत ऐना हा भाग अतिशय दुर्गम क्षेत्रात येत असल्याने अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता दुर्गम भागातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याबाबत तसेच तात्काळ रस्त्याकरीता निधीची तरतूद करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर भागात अशा घटनेची नोंद आढळून आली नाही.
(४) अंशत: खरे आहे.
उप वनसंरक्षक, जव्हार यांच्या दिनांक ७ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये, रस्त्याकरीता वन जमीन उपलब्ध करून दिली आहे.
(५) पालघर जिल्ह्याच्या आरोग्य विभागात ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३०६ उपकेंद्र, ९ जिल्हा परिषद दवाखाना, १८ प्राथमिक आरोग्य पथके, ४९ भरारी पथके व गावस्तरावर २२१७ आशाद्वारे आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यात येत आहेत.
मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत, पालघर जिल्ह्यातील १) प्रजिमा-२० ते मनमोहाडी ते वडपाडा भाटेपाडा रस्ता २) रामा-७७ ते मनमोहाडी रस्ता या रस्त्यांची निवड केलेली असून सदर रस्त्यांच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पालघर, ठाणे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या लहान मुलांकडून वेठबिगारी करून घेण्यात येत असल्याबाबत

**(३३) * १६०३३ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेश कराड, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अंबादास दानवे, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :**
सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पालघर, ठाणे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या गरीबीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या लहान मुलांकडून वेठबिगारी करुन घेत असल्याच्या घटना वारंवार घडत असून उभाडेपाडा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील आदिम आदिवासी कातकरी समाजाच्या १८ मुलांना वेठबिगारीसाठी पालकांनीच विकले असून अहमदनगर तसेच ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील २ मुले व पालघर जिल्ह्यातील दोन मुलींची अवघ्या पाचशे ते हजार रुपयांमध्ये वेठबिगार म्हणून खरेदी करण्यात आल्याची बाब दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धारनहट्टी (ता.जव्हार, जि.पालघर) तालुक्यातील कातकरी आदिवासी कुटुंबातील दोन अल्पवयीन मुलींना दोन धनदांडग्यांनी नगर जिल्ह्यातील तळेगाव येथे किरकोळ पैशांत गहाण ठेवून वेठबिगार म्हणून काम करुन घेतले व ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील दोन मुलांची तसेंच पालघर जिल्ह्यातील दोन मुलींची फक्त ५०० ते १००० रुपयांमध्ये वेठबिगारी म्हणून खरेदी करण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उभाडेपाडा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे कातकरी वस्तीत राहणाऱ्या आदिवासी व अवघ्या ११ वर्षांच्या मुलीला श्री.विकास कुदनार नावाच्या व्यक्तींने रुपये ३०००/- देऊन खरेदी करुन सलग ३ वर्षे वेठबिगार म्हणून काम करवून घेऊन या मुलींला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास तिच्या घरी मरणासत्र अवस्थेत फेकून दिले असतां तिचा मृत्यू झाल्याची घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मेंढया चारण्यासाठी विकण्यात आलेल्या ८ मुलांची पोलिसांनी सुटका केली असून त्यापैकी एका मुलीचा छळामुळे मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले असून उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने लहान आदिवासी मुले खरेदी करणाऱ्या तसेच त्यांच्याकडून वेठबिगारी करुन घेणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास,वेठबिगार कामगार व बाल वेठबिगार कामगारांचे पुनर्वसन करणेकरीता केंद्र शासनाने सन २०१६ मध्ये जाहीर केलेल्या योजनेमध्ये सुधारणा करून नवीन सुधारीत योजना सन २०२१ मध्ये तयार करण्यात आलेली असून सदर मुक्त केलेल्या वेठबिगार कामगारांचे पुनर्वसन करण्याकामी शासनाने किमान रुपये १० लाखांचा निधी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) सदर बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.
(२) धारनहट्टी (ता.जव्हार, जि.पालघर) तालुक्यातील २ मुलींपैकी एका मुलीस तळेगाव (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे व एका मुलीस बोकटे, ता.येवला, जि.नाशिक येथे मेंढया वळण्याच्या कामासाठी लावण्यात आले होते.

तसेच, भिंवडी तालुक्यातील २ लहान मुलांपैकी एका मुलाला ताजु (ता.कर्जत, जि.अहमदनगर) व दुसऱ्या मुलास ढवळपुरी (ता.पारनेर जि.अहमदनगर) येथे मेंढया वळण्याच्या कामासाठी लावण्यात आले होते.

(३) उभाडेपाडा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील आदिवासी पाड्यातील कुमारी गौरी सुरेश आगीवले या मुलीचा दिनांक ०२/०९/२०२२ रोजी मृत्यू झाला आहे हे खरे आहे.
(४) व (५) उपरोक्त घटनांची कामगार आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

संबंधित तहसिलदार यांचेमार्फत वेठबिगार कामगार/बाल वेठबिगार कामगारांना मुक्तता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आली आहेत. तसेच काही कामगारांना संबंधित तहसिलदाराकडून वेठबिगार अथवा बाल कामगार म्हणून घोषित केलेले नाही.

याबाबत संबंधित जिल्हादंडाधिकारी यांचेकडे तात्काळ वेठबिगार दक्षता समितीची बैठका घेऊन,महसूल विभाग,शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, पोलीस विभाग यांना त्यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून,प्रामुख्याने शिक्षण विभागामार्फत सदर वेठबिगार मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध विकास योजनांचा पात्रतेनुसार लाभ देण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

तहसिलदार,जव्हार यांचेमार्फत संबंधित कुंटुंबियांस अंत्योदय योजनेचे लाभार्थी म्हणून शिधापत्रिका देण्यात आली असून, त्यांच्या दोन्ही मुलींना आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच अहमदनगर जिल्ह्यातून मुक्तता करण्यात आलेल्या बालकांपैकी १६ बालकांना शासकीय अदिम जाती माध्यमिक आश्रमशाळा,जि.ठाणे येथे दाखल करण्यात आले असून उर्वरीत बालकांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पोलीस विभागामार्फत वेठबिगारीसारख्या अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी आढळून आलेल्या संबंधित मालकांविरुध्द वेठबिगार पध्दत (निर्मुलन) अधिनियम १९७६, बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अनुसुचित जाती जमाती प्रतिबंध अधिनियम, १९८९ व बाल न्याय हक्क अधिनियम, २०१५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वेठबिगार कामगार कुंटुंबियांच्या पुनर्वसनाकरीता मुक्तता करण्यात आलेल्या वेठबिगार कामगारांना तातडीची मदत देण्यासाठी जिल्हाधिकारी पालघर, अहमदनगर आणि नाशिक यांनी केंद्र शासनाच्या केंद्रीय सुधारित वेठबिगार पुनर्वसन योजना, २०२१ अन्वये प्रत्येकी रुपये १० लक्ष इतक्या तातडीची निधीची (Corpus Fund) मागणी केंद्र शासनाकडे करण्याकरीता महसूल व वन विभागामार्फत प्रस्ताव पाठिवला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील हिवताप कार्यालयाकडून हंगामी फवारणी कर्मचारी असल्याचे बनावट प्रमाणपत्र वाटप केल्याबाबत

**(३४) * १६७०३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील हिवताप कार्यालयातून हंगामी फवारणी कर्मचारी असल्याचे बनावट प्रमाणपत्र वाटप करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रमाणपत्र घेतलेल्या ६९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, परंतु सदरहू प्रमाणपत्र वाटप करणारे तत्कालीन हिवताप अधिकारी, किटक संहारक व वरिष्ठ लिपिक या दोषी अधिकारी कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बनावट प्रमाणपत्र वाटप करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यास स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने बनावट प्रमाणपत्र वाटप करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

६९ बनावट (बोगस) हंगामी फवारणी कर्मचारी प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, बनावट (बोगस) हंगामी फवारणी कर्मचारी प्रमाणपत्र देणारे अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द तात्काळ विभागीय चौकशी सुरु करण्याबात दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये आदेशित केले आहे.
(३) बनावट (बोगस) हंगामी फवारणी कर्मचारी प्रमाणपत्र देणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कायदेशीर कारवाईस स्थगिती देण्यात आली नसून दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द नियमानुसार तात्काळ विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत संबंधितांना आदेश दिले आहे. त्यास अनुसरुन या प्रकरणाशी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
(४) बनावट (बोगस) हंगामी फवारणी कर्मचारी प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्याविरुध्द नियमानुसार विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत आदेशित केले आहे व त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर या प्रकरणात तथ्य आढळून आल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये आदेशित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील बदली कामगारांना कायमस्वरुपी सेवेमध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(३५) * १५८५४ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील बदली कामगारांना कायमस्वरुपी सेवेत घेण्यासाठी औद्योगिक न्यायालयाने दिनांक २७ जुलै, २००३ मध्ये आणि दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी मॅट कोर्टाने राज्य शासनाला आदेश देवूनही बदली कामगारांना कायमस्वरुपी सेवेत समावून घेतले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरम्यान सेंट जॉर्ज रुग्णालयातील बदली कामगारांना दिनांक २० जानेवारी, २००३ मध्ये औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कायमस्वरुपी सेवेत घेतले आल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जे.जे. रुग्णालयात १२२ बदली कामगार असून यात ३० महिला कर्मचारी कार्यरत आहेत, गत २५ ते ३० वर्ष रुग्ण सेवा करुनही त्यांना सेवेत घेतले नसल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सेंट जॉर्ज रुग्णालयातील बदली कामगारांना शासनाने औद्योगिक कोर्टाने दिलेल्या आदेशान्वये कायमस्वरूपी सेवेत समावून घेतले असून त्याचप्रमाणे जे जे रुग्णालयातील कामगारांना कायमस्वरुपी सेवेत समावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) बदली कामगारांच्या संदर्भात विविध न्यायालयाने दिलेले न्यायनिर्णय विचारात घेऊन तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाने उमादेवी विरुध्द कर्नाटक शासन या प्रकरणी दिलेले निर्देश विचारात घेऊन शासनाने एक वेळची बाब म्हणून पात्र बदली कामगारांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक ७/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये विविध संस्थांमधील ६२६ बदली कामगारांना शासन सेवेत सामावून घेण्यात आले. या धोरणानुसार अपात्र ठरलेल्या १२२ बदली कामगारांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात त्यांच्या सेवा नियमित करण्याकरीता मूळ अर्ज दाखल केला होता.सदर प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने दिनांक १४/०२/२०२२ रोजी सेवा नियमित करण्याबाबत न्यायनिर्णय पारीत केला आहे. तथापि, मा.न्यायाधिकरणाचे सदर आदेश हे शासनाच्या धोरणाशी विपरीत असल्याने सदर आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १०७९३/२०२२ अन्वये अपील दाखल करण्यात आले. याप्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशास मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/०९/२०२२ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) सदरचे १२२ बदली कामगार हे शासनाच्या दिनांक ०७/१२/२०१५ रोजीच्या धोरणानुसार अपात्र ठरले असल्याने त्यांच्या सेवा नियमित करण्यात आलेल्या नाहीत.
(४) शासनाच्या दिनांक ०७/१२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एक वेळची बाब म्हणून बदली कामगारांच्या सेवा नियमित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सर जे.जे. रुग्णालयातील पात्र ३२६ बदली कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नायर, जेजे आणि केइएम सह प्रमुख रुग्णालयात व्हर्च्युअल ऑटॉप्सी (आभासी शवविच्छेदन) सुरु करण्याबाबत

**(३६) * १५११९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायर, जेजे आणि केइएम सह प्रमुख रुग्णालयात व्हर्च्युअल ऑटोप्सी (आभासी शवविच्छेदन) सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने मुंबईतील नायर, जेजे आणि केइएमसह प्रमुख रुग्णालयात व्हर्च्युअल ऑटोप्सी (आभासी शवविच्छेदन) सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संचालनालय यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. तसेच याबाबत अभिप्राय देण्याबाबत नगरविकास विभाग व गृह विभाग यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सुशिक्षित बेरोजगारांना भत्ता सुरु करण्याबाबत

**(३७) * १५७२२ डॉ.रणजित पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेरोजगारांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी गरीब कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्याबाबत, तसेच पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील स्त्री रूग्णालयाचे बांधकाम निधीअभावी अपूर्ण असल्याबाबत

**(३८) * १५९४३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १३७५४ ला दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत मंजूर झालेल्या १०० खाटांच्या स्त्री रूग्णालय इमारत बांधकामासाठी निधी मिळालेला नसल्याने सदरील इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊ शकलेले नसून माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सदर बांधकामासाठी ८ कोटी रूपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ८ कोटी रूपये निधी वर्ग करण्यात आला आहे काय, तसेच, सदरील काम पूर्ण करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, परभणी यांचेमार्फत जिल्हा नियोजन समिती अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) परभणी जिल्ह्यातील स्त्री रुग्णालय बांधकामास रु ८००.०० लक्ष ऐवजी केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेला निधी वगळता उर्वरीत ४९५.०० लक्ष रुपयाचा फेर प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यानुसार स्त्रीरुग्णालय इमारतीच्या उर्वरीत बांधकामासाठी लागणाऱ्या रुपये ८२०.०० लक्षच्या अतिरीक्त निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटी मुंबई अंतर्गत वस्तू व सेवा करा पोटी रु २८७.८१ लक्ष निधी उपलब्ध झालेला आहे.

उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक परभणी यांच्या मार्फत जिल्हा नियोजन समितीकडे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक १४/१०/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत ठराव मांडण्यात आलेला आहे परंतु अद्याप निधी मंजूरीबाबत कोणतेही लेखी आदेश प्राप्त झालेले नाहीत त्यामुळे कोणताही निधी जिल्हा नियोजन समिती मार्फत वर्ग करण्यात आलेला नाही तथापी पूर्वी मंजूर असलेल्या निधीमधुन सदर कामे चालु असून ती प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ईश्वर वठार व बिटरगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या गावांना जोडणारा ग्रामीण मार्ग अनेक वर्षांपासून नादुरुस्त असल्याबाबत

**(३९) * १५११४ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईश्वर वठार व बिटरगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या गावांना जोडणारा ग्रामीण मार्ग क्रमांक २९ हा प्लान मध्ये असलेला रस्ता गेल्या अनेक वर्षापासून नादुरुस्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, ईश्वर वठार भोकड मार्ग ते बिटरगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या गावातील रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ग्रामीण मार्ग क्रमांक २९ हा प्लान मध्ये असलेला परंतु अनेक वर्षापासून नादुरुस्त असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
ईश्वर वठार ते बिटरगाव हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२९ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची लांबी ५ कि.मी. असून सदर रस्त्याचा काही भाग नादुरुस्त आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ईश्वर वठार ते बिटरगाव ग्रामीण मार्ग क्र.२९ या रस्त्यापैकी ३५० मी. लांबीवर खड्डे भरण्याचे रुपये ४.९५ लक्षचे काम तसेच सा.क्र.०/०० ते ०/८०० या लांबीमध्ये रुपये १४.८९ लक्षचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सा.क्र.०/८०० ते १/२०० या लांबीमध्ये २५१५ योजनेंतर्गत रुपये १०.०० लक्षचे काम मंजूर आहे. सदर रस्त्याच्या नादुरुस्त लांबीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद, नंदुरबार येथील अर्थ विभागात ई-निविदा प्रसिध्द होण्यापूर्वीच लाखो रुपयांची देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(४०) * १६३७६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व उपाययोजना करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान प्राप्त झाल्यानंतर मास्क, सॅनिटायझर, आरोग्य विभागातील औषधी, यंत्रसामुग्री व साहित्य खरेदीसाठी नंदुरबार, जिल्हा परिषदेमार्फत माहे एप्रिल, २०२० मध्ये नियमान्वये ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-निविदा प्रसिध्द होण्यापूर्वीच दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषद, नंदुरबार येथील अर्थ विभागात संबंधित ठेकेदाराला लाखो रुपयांची देयके अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लेखा परिक्षण व आयुक्त कार्यालयाने आक्षेप घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर गैरव्यवहार प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कारवाई केली आहे वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय.

लेखांकनातील त्रुटी संदर्भातील लेखा आक्षेप स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालयाने घेतला होता. त्यानुषंगाने दिनांक २९/०३/२०२२ रोजी अनुपालन अहवाल सादर करण्यात आला आहे.
(४) सदर प्रकरणी दिनांक २४/०३/२०२१ अन्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणी चौकशी समितीने आपला चौकशी अहवाल दिनांक २६/१०/२०२१ रोजी सादर केला आहे. चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार आढळून आला नसून केवळ लेखांकनातील त्रुटी असल्याबाबत निष्कर्ष नोंदविला आहे. त्या अनुषंगाने लेखांकनात त्रुटी ठेवण्यास जबाबदार तत्कालीन संकलन सहायक रोखपाल श्री.कुलदीप पाडवी यांची एक वेतनवाढ थांबविणेबाबत कारवाई करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील स्त्री रुग्णालयाच्या (डफरीन) एस.एन.सी.यु. विभागातील व्हेंटीलेटरच्या स्फोटात एका शिशूचा मृत्यू झाल्याबाबत

**(४१) * १५२११ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील स्त्री रुग्णालयाच्या (डफरीन) एस.एन.सी.यु. विभागात झालेल्या नवीन व्हेंटीलेटरच्या स्फोटात एका शिशूचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यानी स्वतंत्र आदेश निर्गमित करुन जिल्हा शल्यचिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, उक्त घटनेची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील स्त्री रुग्णालयाच्या (डफरिन) एस.एन.सी.यु. विभागात दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी व्हेंन्टीलेटरचा स्फोट झाला हे खरे आहे, तथापि, त्यामध्ये एकाही शिशूचा मृत्यू झालेला नाही.

सदर एस.एन.सी.यु. विभागात उपचार घेत असलेल्या बालकांना इतरत्र स्थलांतरीत करण्यात आले. त्यापैकी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे स्थलांतरीत करण्यात आलेले एक बालक दिनांक २५/०९/२०२२ रोजी Septicaemia with low birth weight with prematurity (Approx.३४ weeks) with respiratory distress syndrome या आजाराने मृत्यू झाला.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) चौकशी अहवालात अधिकारी व कर्मचारी यांनी योग्य कार्यवाही केल्याचे दिसून आले. त्यामुळे सद्य:स्थितीत कार्यवाही करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ. सावरकुट (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४२) * १६३५८ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. सावरकुट (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे रस्त्याच्या अभावी तेथील आदिवासी बांधवाना दोन ते अडीच किलोमीटर पायी चालत जावे लागत असून कसारा रेल्वे स्थानकावर जाण्याकरिता कोचाळे (ता.मोखाडा) येथून दोन किलोमीटर डोंगरावरुन जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी जाण्या-येण्यासाठी रस्ता व वैद्यकीय सोयी-सुविधांचा अभाव असल्याने सावरकुट येथील एका महिलेला प्रसुतीकळा सुरु झाल्याने डोलीत बसवून अंधाऱ्या रस्त्यातून खोडाळा येथील प्राथमिक आरोग्य रुग्णालयात आणावे लागल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सावरकुट व नजिकच्या परिसरातील गावे ही दळणवळण, सोईसुविधांपासून वंचित असून अन्य गावातील वाड्या-वस्त्यांपर्यंत रस्त्याचे बांधकाम तातडीने करण्यात यावे अशी मागणी सावरकुट ग्रामस्थांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सावरकुट व नजिकच्या परिसरातील अन्य गावातील गरोदर महिला व बालके व ग्रामस्थांना प्राथमिक रुग्णालयात जाता यावे तसेच रस्ता, दळणवळण, इतर सोयी- सुविधा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सावरकुट येथील एका महिलेला प्रसुतीसाठी २ ते ३ कि.मी. अंतर पायी प्रवास करुन त्यापुढे मध्य वैतरणा धरणाजवळून जीप या वाहनाने १६ कि.मी. अंतरावरील प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळा (ता.मोखाडा) येथे नेण्यात आल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(३) व (४) सावरकुट वस्तीला जोडणारा दापूर ते सावरकुट हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१८ दर्जाचा आहे. सद्य:स्थितीत सदरचा रस्ता पायवाट असून एकूण लांबी ३.९ कि.मी. आहे. त्यापैकी सुमारे १.४ कि.मी. लांबी खाजगी व २.५ कि.मी. लांबी वन विभागाची आहे.

वनहद्दीतील जमीन अधिग्रहित करण्यासाठी व खाजगी जागा संबंधिताकडून बक्षिसपत्र/दानपत्र करणेसाठी आवश्यक कार्यवाही ग्रामपंचायत स्तरावर सुरु आहे.

सदर रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेद्वारे प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प विभाग, शहापूर यांना सादर केलेला आहे. निधीच्या व जागेच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत मौजे सावरकुट येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कसारा, उपकेंद्र अजनुप व उपकेंद्र विहीगाव यांचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका व आशा कार्यकर्ती यांचेमार्फत वैद्यकीय सेवा नियमित देण्यात येत असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यात प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया होऊनही शिक्षकांना कार्यमुक्त केले नसल्याबाबत

**(४३) * १६४०८ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया राबविली गेली असून यात इतर जिल्ह्यात नियुक्त साडेचारशे शिक्षकांनी अर्ज करुन स्वजिल्ह्यात म्हणजेच अहमदनगर जिल्ह्यात येण्यासाठी संमती दर्शवूनही अद्याप ९६ शिक्षकांना त्यांच्या जिल्ह्यातून कार्यमुक्त केले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीची प्रक्रिया राबविताना मोठा विलंब होत असल्याने त्यात तात्काळ सुधारणा करुन आंतरजिल्हा बदली प्रक्रिया बदली झाल्याच्या १५ दिवसांत सक्षमपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांसाठी दिनांक ०७/०४/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण विहित करण्यात आले असून त्यानुसार सन २०२२ मधील जिल्हा परिषद शिक्षकांच्या संगणकीय पध्दतीने आंतरजिल्हा बदल्या करण्यात आलेल्या आहेत. सदर बदली प्रक्रियेअंतर्गत एकूण २६५ शिक्षकांना जिल्हा परिषद, अहमदनगर येथे आंतरजिल्हा बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आली असून त्यापैकी एकूण १६९ शिक्षक जिल्हा परिषद, अहमदनगर येथे हजर झालेले आहेत. उर्वरित ९६ शिक्षक, त्यांच्या मूळ जिल्हा परिषदेने कार्यमुक्त न केल्यामुळे जिल्हा परिषद, अहमदनगर येथे हजर झालेले नाहीत.

(२) सदर बदली प्रक्रियेंतर्गत आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना दिनांक ०५/०९/२०२२ पर्यंत कार्यमुक्त करण्याच्या सूचना शासनाकडील दिनांक ३०/०८/२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या होत्या. तथापि, काही जिल्हा परिषदांतील रिक्त पदांची टक्केवारी १०% पेक्षा जास्त असल्याने, शासनाच्या धोरणानुसार अशा जिल्हा परिषदेमार्फत आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सन २०१७ ते २०२२ या कालावधीमध्ये संगणकीय पध्दतीने पार पडलेल्या जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेंतर्गत बदली झालेल्या सर्व जिल्हा परिषदांतील (ज्या जिल्हा परिषदेतील रिक्त पदांची टक्केवारी १०% पेक्षा जास्त आहे, अशा जिल्हा परिषदांसह) शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे निर्देश दिनांक ०२/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोवंडीच्या विशेष बालगृहातून ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याबाबत

**(४४) * १६४७५ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोवंडीच्या विशेष बालगृहातून ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या असून वसतिगृहाची खिडकी फोडून अज्ञात व्यक्तीने त्यांना पळवून नेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बालगृहात अशा घटना घडून नयेत यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

शासकीय मुलींचे विशेष पुनर्वसन केंद्र (विशेष बालगृह), देवनार, मुंबई या संस्थेतून दिनांक १० सप्टेंबर, २०२२ मध्यरात्री ६ बालिका न सांगता निघून गेल्या होत्या. सदर सर्व ६ बालिकांना पोलीस प्रशासनाच्या मदतीने बाल कल्याण समितीच्या आदेशाने पालकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.
(२) आयुक्त, महिला व बालविकास विभाग, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सदर घटनेची चौकशी तसेच राज्यातील सर्व निवासी संस्थांच्या सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचविण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर संस्थेच्या खिडक्यांची दुरुस्ती करण्यात आली असून या विभागांतर्गत असणाऱ्या राज्यातील सर्व शासकीय संस्थांवर महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्याकडून सुरक्षा रक्षक नेमण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात अँजिओग्राफी व आँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया बंद असल्याबाबत

**(४५) * १६१४८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय घाटी रुग्णालयात हृदयरोग रुग्णांसाठी अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी सुविधा सन २००७ मध्ये सुरु करण्यात आली असून त्यासाठी फोरडी इको हे अत्याधुनिक मशीन देखील रुग्णालयात बसविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही सुविधा रुग्णालयातील सीव्हीटीएस विभागाचे कॅथलॅब नादुरुस्त व कालबाह्य झाल्याने तसेच अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टीसाठी लागणारे साहित्य, स्टेंटच्या खरेदी अभावी गत दीड वर्षापासून म्हणजे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यानपासून बंद पडली असून रुग्णांना आरोग्यसेवेपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयातील सुपरस्पेशालिटी ब्लॉकमध्ये नवीन कॅथलॅब यंत्र व फोरडी इको मशीन येवून एक वर्षापेक्षाही अधिक काळ झाला असूनही सदर नवीन कॅथलॅब यंत्राचा फोरडी इको मशीनचा वापर करुन बंद करण्यात आलेली ही सुविधा अद्याप सुरु झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने औरंगाबाद येथील शासकीय घाटी रुग्णालयात हृदयरोग रुग्णांसाठी सदर फोरडी इको मशीनचा वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन खाटांची संख्या वाढविण्याबाबत

**(४६) * १५३५५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुपांतर शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, २००४ रोजी वा त्यासुमारास केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयात मनुष्यबळ, इमारत, निवासस्थाने व औषधी पुरवठा ३० खाटांनुसार असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यास समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालय पुणे-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर असल्याने व महाराष्ट्र सिमेलगतची व शेजारील कर्नाटक राज्यातील रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय, उमरगा येथे १०० खाटांची संख्या वाढवून ३०० खाटांची करावी व मनुष्यबळ, जागा, इमारत, औषधी, इतर भौतिक सोई-सुविधा ३०० खाटांच्या नामांकनानुसार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

१०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयास आवश्यक असणारे मनुष्यबळ, इमारत व औषध पुरवठा उपलब्ध आहे.

(३) होय.

(४) उमरगा येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा केअर युनीट ही स्थापन करण्यात आलेले असून सदर ठिकाणी १०० खाटांची संख्या वाढवून ३०० खाटांची संख्या करण्याबाबतची मागणी शासनास प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माणगाव तालुक्यात आपत्कालीन परिस्थितीत अत्यावश्यक आरोग्यसेवा मिळण्यासाठी ट्रॉमा केअर सेंटर सज्ज करण्याबाबत

**(४७) * १६५०३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचे वाहतूक केंद्र असलेला माणगाव तालुक्यात आपत्कालीन परिस्थितीत अत्यावश्यक आरोग्यसेवा मिळण्यासाठी ट्रॉमा केअर युनिट उपलब्ध होण्याबाबत माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी मिळाली असून सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होवूनही सदर ट्रॉमा केअर सेंटरच्या उभारणीला अद्याप सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई गोवा महामार्गावरील माणगाव, उपजिल्हा रुग्णालय हे दिवसेंदिवस अद्ययावत होत असून अपघातग्रस्तांवर उपचार करण्यापासून ते विविध आजारावरील रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करण्यासाठी सदर ट्रॉमा केअर सेंटर सज्ज होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वसामान्य नागरिकांना तसेच दक्षिण रायगड सह नजीकच्या रत्नागिरी जिल्ह्यातील विविध तालुक्यातून अनेक रुग्णाना माणगाव, उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येत असून अत्यावश्यक सेवा उपलब्धतेसाठी ट्रॉमा केअर सेंटरचा लाभ घेता येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने माणगाव ट्रॉमा केअर सेंटर उभारणीच्या प्रलंबित प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही तसेच उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये, वडखळनाका जि.रायगड येथे ट्रॉमा केअर युनिट करिता जागा प्राप्त होत नसल्यामुळे, उपजिल्हा रुग्णालय, माणगाव याठिकाणी स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक २१/०४/२०२२ रोजीच्या आदेशान्वये, पंचायत समिती माणगांव यांच्या अखत्यारीत असलेली मौजे खांदाड-माणगांव येथील गट नंबर/हि. नं.

६८४ क्षेत्र ०.३४.० हे.आर. ही शासकीय जमीन ट्रामा केअर युनिट व निवासस्थानाकरीता हस्तांतरित करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत जागेवर ट्रामा केअर युनिट मुख्य इमारत व निवासस्थान बांधकाम खर्चाची अंदाजपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी रुग्ण प्रतिक्षेत असल्याबाबत

**(४८) * १५१८९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षेत्रिय प्रत्यारोपण समन्वय केंद्राने (झेडटीसीसी) दिलेल्या माहितीनुसार, मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ३ हजार ३१९ रुग्ण प्रतिक्षेत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय, मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी बहुतांश रुग्ण प्रतिक्षेत राहण्यामागची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, मूत्रपिंड प्रत्यारोपणाची प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत आणि पारदर्शक होण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समिती या संदर्भात नियमावली तयार करुन मूत्रपिंडदात्याची माहिती आधार कार्डाशी संलग्न करून ऑनलाईन पध्दतीने माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मूत्रपिंड प्रत्यारोपण जलद गतीने व्हावे यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

भारतात मधुमेह व हायपरटेंशनच्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने किडनी निकामी होण्याचे प्रमाण देखील वाढत आहे. त्यामुळे डायलिसीसवर जाणाऱ्या रुग्णांची संख्या १५० प्रती दशलक्ष इतकी असून दरवर्षी अंदाजे एक लाख रुग्ण नव्याने डायलिसीसची सुरुवात करतात. ह्यातील अनेक रुग्णांसाठी नातेवाईकांमध्ये किडनी दाता किंवा कॅडेव्हर (मेंदू मृत) ऑर्गन डोनर पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने रुग्ण प्रतिक्षेत राहतात.

(२) व (३) हे खरे नाही.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ सुधारणा २०११ मधील तरतूदीनुसार मुत्रपिंड प्रत्यारोपणाची प्रक्रिया करण्यात येते.

(४) जास्तीत जास्त कॅडेव्हर अवयवदान व्हावे याबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याकरिता रिजनल ऑर्गन ॲण्ड टिश्यु ऑर्गनायझेशन के.ई.एम. हॉस्पीटल परेल, मुंबई, राज्यातील विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्रे, मुंबई पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच एनजीओ यांचेमार्फत पथनाट्य, बॅनर्स, पोस्टर्स, सिनेमागृहामध्ये जाहिराती, रेडिओ जिंगल्स तसेच चर्चासत्राद्वारे कार्यक्रम राबविण्यात येत असतात. जास्तीत जास्त

जनजागृती करण्यात येत आहे. त्याचप्रामाणे जास्तीत जास्त रुग्णालयांना अवयवदानासाठी रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना प्रवृत्त करावे म्हणून नॉन ट्रान्सप्लॉन्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणी दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.कायलारी व पाचडोंगरी (ता.मेळघाट, जि.अमरावती) या दुर्गम परिसरातील गावांसाठी राष्ट्रीय पेयजल योजनेतून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(४९) * १६०३२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. कायलारी व पाचडोंगरी (ता.मेळघाट, जि.अमरावती) या दुर्गम परिसरातील गावांसाठी राष्ट्रीय पेयजल योजनेतून दीड कोटी रूपये इतक्या खर्चाची पाणीपुरवठा योजना मंजूर होऊन त्यासाठी जलकुंभ बांधण्यात येऊन गावात नळाद्वारे पाणीपुरवठा देखील सुरू करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे ५० हजार ३४० रूपये रकमेचे विद्युत देयक न भरण्यात आल्यामुळे विद्युत कंपनीने योजनेचा विद्युत पुरवठाच खंडित केल्यामुळे गावांना होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याचे दिनांक १४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावातील विहिरीतील पाण्याचा उपसा गावकऱ्यांना करावा लागून ते दूषित पाणी पिण्यामुळे मौ. पाचडोंगरी गावांतील तरुण शेतकरी व एक महिला दोघेही मृत्यू पावल्याची दुर्दैवी घटना घडल्याचेही त्यासुमारास निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर दूषित पाणी अन्यत्र पसरु नये याकरीता सदर परिसरातील साडेसात हजाराहून अधिक जलस्त्रोतांची तपासणी करण्याचे तसेच मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लक्ष रूपयांची आर्थिक मदत करण्याची मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मृतांच्या कुटुंबियांना शासनाने जाहीर केलेली व स्थानिक प्रहार संघटनेने जाहीर केलेली आर्थिक मदत देण्यात आली आहे काय, असल्यास केव्हा,
(६) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वीजपुरवठयाअभावी बंद झालेली सदर राष्ट्रीय पेयजल पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय.
मौ. कायलारी व पाचडोंगरी (ता मेळघाट, जि.अमरावती) या दुर्गम परिसरात गावांसाठी राष्ट्रीय पेयजल योजनेतून पाणीपुरवठा करण्यात येत असून वीज देयक न भरल्याने वीज खंडीत करण्यात आल्याने योजनेद्वारे सुरु असलेला पाणीपुरवठा बंद पडला होता. गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवल्यामुळे नियमीत स्त्रोता व्यतीरिक्त इतर स्त्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरणार असल्यास क्लोरीन द्रावण व

क्लोरीनच्या गोळया वापरून निर्जंतूक केलेले पाणी पिण्यासाठी वापरण्याच्या सूचना असतानाही पाचडोंगरी या गावालगत असलेल्या खाजगी मालकीच्या विहीरीचे निर्जंतूकीकरण न केलेले पाणी पिण्याकरिता वापरल्याने दिनांक ०७/०७/२०२२ रोजी अतिसाराची लागण होऊन पाचडोंगरी येथील ३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(४) व (५) दूषित पाण्यामुळे मृत झालेल्या मृतांच्या नातेवाईकांना पाच लक्ष रुपयांची आर्थिक मदत करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. त्यानुसार दिनांक १२/०७/२०२२ रोजी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(६) प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून संबंधित ग्रामसेवक व सरपंच दोषी आढळून आले असून त्यानुषंगाने पुढील कारवाई सुरु आहे.

दिनांक ०८/०७/२०२२ रोजी विद्युत पुरवठा सुरु केल्यावर योजनेद्वारे गावाला पूर्ववत पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: गोंदिया जिल्ह्यातील सर्वच बाल संक्रमण शाळा अद्याप बंद असल्याबाबत

**(५०) * १५८६३ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच गोंदिया जिल्ह्यातील सर्वच बाल संक्रमण शाळा १ डिसेंबर, २०१९ पासून अद्याप बंद असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार असल्यामुळे त्यांना शिक्षण घेणे आवश्यक असतानाही जिल्ह्यातील १६ बाल संक्रमण शाळांमध्ये शेकडो बालकामगार विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलांसाठी सुरु करण्यात आलेल्या सर्व संक्रमण शाळा शासन कधीपासून सुरु करणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर संक्रमण शाळांमध्ये शिकत असलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) गोंदिया जिल्ह्यात केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पामार्फत बाल कामगारांकरिता १६ विशेष प्रशिक्षण केंद्रे कार्यरत होती.

सदर विशेष प्रशिक्षण केंद्राचा राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्वानुसार २ वर्षांचा कालावधी संपुष्टात आल्याने बंद करण्यात आली आहेत, हे खरे आहे.

(२) गोंदिया जिल्ह्यातील माहे नोव्हेंबर, २०१९ सुरू असलेल्या १६ विशेष प्रशिक्षण केंद्राचा २ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे तेथील ४३५ विद्यार्थ्यांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे.

(३) व (४) विशेष प्रशिक्षण केंद्राचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर ती बंद करण्यात आली आहेत.

राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाची दिनांक ३१/०३/२०२१ रोजी मुदत संपुष्टात आल्यानंतर, केंद्रशासनाने मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प ही योजना दिनांक १४/०३/२०२२ रोजी शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या समग्र शिक्षा अभियानामध्ये विलीन केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५१) * १५८८२ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) इमारतीचे बांधकाम, रस्ते, कंपाऊंड वॉल जुने झाले असून इमारत जीर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात दररोज २५०० रुग्णांची बाहय रुग्ण तपासणी होत असल्याने औषधी/सर्जिकल साहित्य अत्यंत अल्प प्रमाणात उपलब्ध असल्याने समस्या उद्भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात आवश्यक त्या प्रमाणात औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीसाठी व यंत्र सामुग्री दुरुस्तीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे निधीची मागणी केली असली तरी निधी मिळत नसल्याने रुग्णाला सेवा देण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने इमारत बांधकाम, रस्ते, कंपाऊंड वॉल दुरुस्ती, औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) औषधे व सर्जिकल साहित्याचा पुरवठा हाफकिन महामंडळामार्फत करण्यात येत असून या व्यतिरिक्त स्थानिक स्तरावर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, स्वीय प्रपंजी खाते,सी.एस.आर.फंड, जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध निधीतून तातडीची व आवश्यक खरेदी करून रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यात येत आहे.

(४) इमारत बांधकाम रस्ते,कपाऊंड वॉल दुरुस्ती इत्यादीबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रुप ग्रामपंचायत रामपूर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थी घरकुलापासून वंचित असल्याबाबत

**(५२) * १६३७७ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत रामपूर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत असलेल्या लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित ठेवून त्याऐवजी खोट्या लाभार्थ्यांची नावे दर्शवून लाभाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करुन आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन कृषीमंत्री तथा माजी सैनिक कल्याण मंत्री यांच्याकडे दिनांक ०७/०८/२०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी आढळलेल्या संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या संकेतस्थळाच्या आवास सॉफ्ट प्रणालीच्या उणिवांचा गैर फायदा घेऊन १८ मूळ लाभार्थ्यांऐवजी इतर व्यक्तींचे रजिस्ट्रेशन व बँक खाते क्रमांक समाविष्ट करुन अनुदान काढण्यात आल्याचे चौकशीअंती निदर्शनास आले. सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या ३ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तत्कालिन डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. तसेच कनिष्ठ सहाय्यक, सहाय्यक लेखाधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.तसेच गट विकास अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. वर नमुद १८ पैकी १२ चुकीच्या व्यक्तींकडून रक्कम वसुल करण्यात आलेली असून शासनास समर्पित करण्यात आलेली आहे, मूळ १२ लाभार्थ्यांपैकी ६ लाभार्थ्यांना १ ला हप्ता वितरीत करण्यात आला असून उर्वरीत ६ लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच उर्वरीत ६ चुकीच्या व्यक्तींकडून अनुदान वसुल करण्याकरीता प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,नंदुरबार दिनांक ३०/०८/२०२२ व दिनांक २९/११/२०२२ रोजी अंतिम पत्र देण्यात आले असून अनुदानाची रक्कम भरणा न केल्यास सदर व्यक्तींवर गुन्हा दाखल करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा रुग्णालयात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून कारवाई करण्याबाबत

**(५३) * १६२७५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना जबाबदारीचे वाटप केले नसल्याने सारी वॉर्डात दाखल करण्यात आलेल्या एका ६५ वर्षीय रुग्णाचा

ऑक्सिजनअभावी मृत्यू झाल्याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, परभणी यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी, परभणी यांची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना कालावधीत केलेल्या गैरव्यवहाराबाबत लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्ह्यातील ६ वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक तयार केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा रुग्णालय, परभणी येथून रेमडेसिवीर लसींचे गैरव्यवहार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि तद्नुषंगाने तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक, परभणी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

रुग्णालयात ऑक्सिजन अभावी कोणत्याही रुग्णांचा मृत्यू झालेला नाही. तथापि, दिनांक ०३/०४/२०२१ रोजी सकाळी ३.४८ वा. श्री.दासाराव दत्तराव आंबटपुरे, वय ६५ यांचा ARDS (Acute Respriatory Distress Syndrome) या आजाराने सारी वॉर्डामध्ये मृत्यू झाल्याप्रकरणी रुग्णांच्या नातेवाईकांनी केलेल्या गदारोळाच्या वेळी रुग्णालयाच्या काचा तसेच फायबरच्या खुर्च्या आणि स्ट्रेचर यांची तोडफोड केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे आहे.

जिल्हा परिषद कोविड सेंटर येथे कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेल्या परिचारिका यांनी शासकीय कोटयातील रुग्णांचे रेमडेसिवीर इंजेक्शन चोरले व स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी चढ्या भावाने अवैधरित्या कोणत्याही बिलाशिवाय विक्री केल्याप्रकरणी पोलीस ठाणे, नानलपेठ, परभणी यांचेकडे गु.र.न. २००/२०२१, कलम ३८०, ३४ भा.द.वि. सहक.३ (२)(जी), ७ (३) ई.सी.एक्ट सहक १८ (क)(१),२७ औषधीद्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधि. १९४० अंतर्गत गुन्हा नोंद आहे. सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. तथापि, उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांचे स्तरावर समिती गठीत करून सदर प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोहरादेवी व उमरी (जि.वाशिम) येथील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५४) * १६४१६ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी आणि उमरी या दोन्ही गावांचे मोठे धार्मिक महत्व असल्याने दोन्ही गावांच्या विकासासाठी रुपये ३१२ कोटी रक्कमेचा विकास आराखडा तयार करण्यात आला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर आराखड्यास तात्काळ मंजुरी देवून निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
पोहरादेवी आणि उमरी, जि.वाशिम या तीर्थस्थळांचा रुपये ३२६.२५ कोटी रकमेचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.
(२) यासंदर्भात मा.उच्चस्तरीय समितीची दिनांक १७/१०/२०२२ व दिनांक १४/११/२०२२ रोजी दोन बैठका पार पडल्या असून पुढील कार्यवाही विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेस विलंब होत असल्याबाबत

**(५५) * १६४८१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदांमधील १३,५१४ रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात येणारी भरती प्रक्रिया रद्द करण्याचा ग्रामविकास विभागाने निर्णय घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २० लाख अर्जदारांची माहिती संग्रहित न ठेवता आल्याने ही भरती प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भरतीप्रक्रियांसाठी माहिती गोळा करण्याचे काम न्यास कंपनीला देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने भरती प्रक्रियेला विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करुन रिक्त पदांची भरती करावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

(४) याकरीता उमेदवारांकडून नव्याने अर्ज मागवून पदभरती करण्याकरीता ग्रामविकास विभागाच्या दिनांक २१/१०/२०२२ व दिनांक १५/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम (परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक) जाहीर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.